| MHWR010009862022 | | | |
|---|---|---|---|
| | खटला दाखल तारीख | : | १७.०५.२०२२ |
| | खटला नोंदणी तारीख | : | १७.०५.२०२२ |
| | खटला निकाल तारीख | : | ३१.०७.२०२६ |
| | **कालावधी – ०४ वर्ष, ०२ महिने, १४ दिवस** | | |

| **सत्र न्यायाधीश, वर्धा यांचे न्यायालयात<br>( पीठासीन अधिकारी – हेमंत भ. गायकवाड)** | |
|---|---|
| **सत्र मामला क्रमांक ४५/२०२२** | **निशाणी क्रमांक – ११०.** |
| **सीएनआर क्रमांक –<br>एमएचडब्ल्यूआर०१०००९८६२०२२** | आरोप– भारतीय दंड विधानाचे कलम ३०२ अंतर्गत.<br>**प्रथम छापील खबर क्रमांक ३९/२०२२** |

**भाग 'अ'**

**(परिच्छेद ४४(१) प्रकरण ६ क्रिमीनल मॅन्यूअल)**

| **प्रथम खबरी अहवाल माहिती / गुन्हा आणि पोलीस ठाणे** | | |
|---|---|---|
| फिर्यादी/अभियोग पक्ष | | महाराष्ट्र शासन,<br>द्वारा–पोलीस ठाणे अधिकारी, पोलीस ठाणे,<br>पुलगाव, तालुका पुलगाव, जिल्हा वर्धा. |
| अभियोग पक्षातर्फे प्रस्तुत | | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता,**<br>श्री. व्ही. आर. घुडे |
| आरोपी | | निळकंठ उर्फ कंठया देवराव ठाकरे,<br>वय – ५५ वर्ष, व्यवसाय – मजुरी,<br>राहणार — येसगांव, देवळी<br>तालुका देवळी, जिल्हा वर्धा. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | | श्रीमती. ए.डी.देशपांडे |

## भाग 'ब'

## (परिच्छेद ४४(२) प्रकरण ६ क्रिमीनल मॅन्यूअल)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | : | ०९.०१.२०२२ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | : | ०९.०१.२०२२ |
| दोषारोपपत्र दिनांक | : | १७.०५.२०२२ |
| दोषारोपपत्र निश्चित दिनांक | : | ०५.०७.२०२३ |
| पुरावा सुरुवात दिनांक | : | १९.०९.२०२४ |
| कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहिता प्रमाणे आरोपीची जबानी नोंदविल्याचा दिनांक | : | ०५.०५.२०२६ |
| युक्तिवादाची तारीख | : | ०६.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवल्याचा दिनांक | : | लागू नाही. |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | ३१.०७.२०२६ |
| आरोपीच्या शिक्षेबाबतचा दिनांक | : | लागू नाही. |

## आरोपीचा तपशील

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप पत्र निश्चित | दोषमुक्त केले किंवा शिक्षा सुनावली | शिक्षा काय दिली | अटक झाल्यापासून न्यायनिर्णय पर्यंत आरोपी कारागृहात होता काय? असल्यास कलम ४२८ फौ.प्र.सं. नुसार सुट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | निळकंठ उर्फ कंठया | १०.०१.२०२२ | २३.०५.२०२३ | भा.दं.वि. चे कलम ३०२ अंतर्गत. | दोषमुक्त केले. | नाही | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | देवराव ठाकरे | | | | | | |

**भाग 'क'**

**(परिच्छेद ४४(३) प्रकरण ६ क्रिमीनल मॅन्यूअल)**

**(अभियोग पक्षातर्फे/आरोपीतर्फे/न्यायालयातर्फे साक्षीदारांची यादी)**

| अभियोग पक्षातर्फे साक्षीदार | | |
|---|---|---|
| **साक्षीदार क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
| साक्षीदार क्रमांक १ | अर्चना अमोल तालन (निशाणी क्रमांक ३०) | फिर्यादी |
| साक्षीदार क्रमांक २ | जय राजेद्रराव तालन (निशाणी क्रमांक ३५) | साक्षीदार |
| साक्षीदार क्रमांक ३ | निलेश सदाशिवराव तालन (निशाणी क्रमांक ३८) | साक्षीदार |
| साक्षीदार क्रमांक ४ | सुरेद्र पद्माकर डफरे (निशाणी क्रमांक ३९) | साक्षीदार |
| साक्षीदार क्रमांक ५ | सचिन बाळकृष्ण तालन (निशाणी क्रमांक ४७) | साक्षीदार |
| साक्षीदार क्रमांक ६ | दिवाकर बाळकृष्ण तालन (निशाणी क्रमांक ४९) | साक्षीदार |
| साक्षीदार क्रमांक ७ | गोकुळ देवरावजी तालन (निशाणी क्रमांक ५२) | साक्षीदार |
| साक्षीदार क्रमांक ८ | अंकुश संजय भडके | साक्षीदार |

| | | |
|---|---|---|
| | (निशाणी क्रमांक ५३) | |
| साक्षीदार क्रमांक ९ | कृष्णा चंद्रभान आताग्रे<br>(निशाणी क्रमांक ६०) | पंच साक्षीदार |
| साक्षीदार क्रमांक १० | राजेश तुळशिराम तिरपुडे<br>(निशाणी क्रमांक १६१) | साक्षीदार |
| साक्षीदार क्रमांक ११ | सुषमा सचिन कडू<br>(निशाणी क्रमांक ७२) | साक्षीदार |
| साक्षीदार क्रमांक १२ | डॉ. प्रविण रामभाऊ झोपाटे<br>(निशाणी क्रमांक ८३) | वैद्यकीय अधिकारी |
| साक्षीदार क्रमांक १३ | प्रमोद नागोरावजी पाटील<br>(निशाणी क्रमांक ९०) | तपासी अधिकारी |

| **आरोपीतर्फे साक्षीदार** | | |
|---|---|---|
| **साक्षीदार क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
| साक्षीदार क्रमांक १ | सचिन मारोतराव कडू<br>(निशाणी क्रमांक १०७) | साक्षीदार |

| **न्यायालयातर्फे साक्षीदार** | | |
|---|---|---|
| **साक्षीदार क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
| | नाही | नाही |

(अभियोग पक्षातर्फे/आरोपीतर्फे/न्यायालयातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी)

'अ' – अभियोगपक्षातर्फे –

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १ | नि.क्र.३१/सा.क्र.१ | दिनांक १०.०१.२०२१ रोजीची, तक्रार. |
| २ | नि.क्र.३२/सा.क्र.१ | दिनांक १०.०१.२०२१ रोजीची, प्रथम खबर. |
| ३ | नि.क्र.३३/सा.क्र.१ | दिनांक ०६.०२.२०२२ रोजीचे, जप्ती पत्रक. |
| ४ | नि.क्र.४०/सा.क्र.४ | दिनांक १०.०१.२०२२ रोजीचा, घटनास्थळ पंचनामा. |
| ५ | नि.क्र.४१/सा.क्र.४ | दिनांक १०.०१.२०२२ रोजीचे, सुचनापत्र. |
| ६ | नि.क्र.४२/सा.क्र.४ | दिनांक १०.०१.२०२२ रोजीचा, अटक पंचनामा. |
| ७ | नि.क्र.४३/सा.क्र.४ | दिनांक १०.०१.२०२२ रोजीचे, जप्ती पत्रक. |
| ८ | नि.क्र.६१/सा.क्र.९ | दिनांक १२.०१.२०२२ रोजी, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, पुलगाव यांना दोन शासकीय पंच मिळणेबाबत पाठविलेले पत्र. |
| ९ | नि.क्र.६२/सा.क्र.९ | दिनांक १२.०१.२०२२ रोजीचे, सुचनापत्र. |
| १० | नि.क्र.६३/सा.क्र.९ | आरोपीचा निवेदन पंचनामा. |
| ११ | नि.क्र.६४/सा.क्र.९ | आरोपीने माल काढून देण्याचा पंचनामा. |
| १२ | नि.क्र.६५/सा.क्र.९ | कपडयांचे बंडल फोडण्याचा पंचनामा. |
| १३ | नि.क्र.६६/सा.क्र.९ | दिनांक १६.०१.२०२२ रोजीचे, जप्तीपत्रक. |
| १४ | नि.क्र.६७ व ६८/सा.क्र.९ | दिनांक १४.०१.२०२२ रोजीचे, दोन जप्तीपत्रक. |
| १५ | नि.क्र.८४/सा.क्र.१२ | दिनांक १०.०१.२०२२ रोजीचे, वैद्यकीय अधिकारी, कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम यांना मृतकक अमोल |

| | | |
|---|---|---|
| | | बाळकृष्ण तालन याचा शवविच्छेदन अहवाल मिळण्याकरीता पाठविलेले पत्र. |
| १६ | नि.क्र.८५/सा.क्र.१२ | शवविच्छेदन तपासणी अहवाल. |
| १७ | नि.क्र.८६/सा.क्र.१२ | दिनांक १४.०१.२०२२ रोजीचे, वैद्यकीय अधिकारी, कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम यांना जप्त मुद्देमाल एक लाकडी उभारीचा क्वेरी करुन अहवाल मिळण्याकरीता पाठविलेले पत्र. |
| १८ | नि.क्र.९०/सा.क्र.१३ | दिनांक १०.०१.२०२२ रोजी, तहसीलदार, देवळी यांना पंच साक्षीदार उपलब्ध करुन मिळण्याबाबत पाठविलेले पत्र. |
| १९ | नि.क्र.९१/सा.क्र.१३ | न्यायवैद्यक/वैज्ञानिक घटनास्थळ अहवाल. |
| २० | नि.क्र.९२/सा.क्र.१३ | अटकेचे/न्यायालयाच्या स्वाधीन होण्याचे ज्ञापन. |
| २१ | नि.क्र.९३ व ९४/सा.क्र.१३ | दिनांक १८.०१.२०२२ रोजीचे, प्रादेशिक न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळा, नागपूर यांना जप्त मुद्देमालाचे रासायनिक परीक्षण करुन अभिप्राय मिळण्याकरीता पाठविलेले दोन पत्र. |
| २२ | नि.क्र.९५ व ९६/सा.क्र.१३ | दिनांक १८.०१.२०२२ रोजीच्या दोन ईनव्हाईस चालान. |
| २३ | नि.क्र.९७/सा.क्र.१३ | दिनांक ०६.०२.२०२२ रोजीचे, जप्तीपत्रक. |
| २४ | नि.क्र.९८/सा.क्र.१३ | दिनांक १७.०२.२०२२ रोजी, मयत अमोल तालन व आरोपीची मुलगी सुषमा कडू याचे मोबाईल क्रमांकाचे सी.डी.आर. व एस.डी.आर.मिळण्याकरीता पाठविलेले पत्र. |
| २५ | नि.क्र.९९/सा.क्र.१३ | दिनांक २२.०२.२०२२ रोजी, वैद्यकीय अधिकारी, कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम यांना मयत अमोल |

| | | |
|---|---|---|
| | | तालन याचे उपचाराचे कागदपत्र मिळण्याकरीता पाठविलेले पत्र. |
| २६ | नि.क्र.१००/सा.क्र.१३ | दिनांक २४.०२.२०२२ रोजी, तपासी अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, देवळी यांना घटनास्थळ परिसरातील विद्युत प्रवाह सुरु असल्याबाबतची माहीती मिळणेबाबत दिलेले पत्र. |
| २७ | नि.क्र.१०१/सा.क्र.१३ | दिनांक २५.०२.२०२२ रोजी, सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, देवळी यांनी घटनास्थळ परिसरातील विद्युत प्रवाह सुरु असल्याबाबतची माहीती दिल्याबाबतचे पत्र. |
| २८. | नि.क्र.१०२ व १०३/सा.क्र.१३ | आरोपीच्या घराचे विद्युत बील आणि कराची मागणी पावती. |

**'ब' – आरोपीतर्फे –**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| | नाही | नाही |

**'क' – न्यायालयातर्फे –**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १ | नि.क्र.७० | मरणान्वेषण प्रतिवृत्त. |
| २ | नि.क्र.७३ ते ७६ | एकूण चार रासायनिक विश्लेषण अहवाल. |

**'ड' – महत्वाचे पुरावे –**

| अनुक्रमांक | मुद्देमाल वस्तु क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १ | एम.ओ.क्रमांक १ | लाकडी उभारी. |
| २ | एम.ओ.क्रमांक २ ते ५ | मयत अमोल तालन याचे कपडे; मिलेट्री रंगाचा फुल पॅन्ट, निळया रंगाची अंडरवेअर, लाल रंगाचा कापडी गमछा आणि लाल फुल व पांढरे काळे लाल रेषांची चादर. |
| ३ | एम.ओ.क्रमांक ६ | मयत अमोल तालन याचे जर्कीन. |
| ४ | एम.ओ.क्रमांक ८ व ९ | फिक्कट निळया रंगाचा फुल शर्ट आणि हिरव्या रंगाची फुल पॅन्ट. |

## –न्यायनिर्णय–

## (जाहीर दिनांक ३१ जुलै, २०२६)

यातील आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३०२ अन्वये दोषारोप ठेवण्यात आलेला आहे.

२. अभियोगपक्षाच्या खटल्याची थोडक्यात हकीकत अशी की,

फिर्यादी अर्चना अमोल तालन, राहणार येसगांव, तालुका देवळी, जिल्हा वर्धा हिने तक्रार दिली की, दिनांक ०९.०१.२०२२ रोजी, रात्री अंदाजे ८.०० वाजताच्या दरम्यान, तिचे पती अमोल तालन हे जखमी अवस्थेत तिच्या घरी आले. तिने तिच्या पतीला काय झाले असे विचारले असता तिच्या पतीने गावात राहणा–या निळकंठ ठाकरे/आरोपीने त्याची मुलगी सुषमा कडू हिच्यासोबत

असलेल्या अनैतिक संबंधाचे कारणावरुन त्याला लाकडी काठीने गावातील पाण्याच्या टाकीजवळ मारहाण केल्याचे सांगितले. तसेच त्यांच्या गावातील जय तालन याने आरोपी हा सायंकाळी ७.४५ वाजताच्या दरम्यान, पाण्याचे टाकीजवळुन पळतांना दिसल्याचे सांगितले. म्हणुन तिने त्वरीत तिचे भासरे दिवाकर बाळकृष्ण तालन, यांना माहिती दिली आणि दिवाकर तालन, याचे ओमनी गाडीत टाकुन वर्धा येथील सामान्य रुग्णालयात नेले. तेथुन त्यांना कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम येथे पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले. सेवाग्राम रुग्णालयात दाखल करताना तिचे पती मरण पावले. तिच्या पतीच्या डोक्यावर, गालावर व छातीवर मार होता.

३. आरोपीची मुलगी सुषमा कडू हिचे तिचे पतीसोबत अनैतिक संबंध होते, त्यामुळे बदनामी झाली या कारणावरुन आरोपीने तिच्या पतीला गावातील पाण्याच्या टाकीजवळ डोक्यावर, तोंडावर व छातीवर मारुन गंभीर जखमी केले आणि उपचाराकामी सेवाग्राम रुग्णालयात नेत असताना त्याचा मृत्यू झाला. म्हणुन फिर्यादीने पोलीस स्टेशन, पुलगाव येथे तक्रार दाखल केली.

४. सदर तक्रारीवरुन पोलीस ठाणे, पुलगाव येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ३९/२०२२, भारतीय दंड संहितेचे कलम ३०२ (यापुढे '**संहिता**' असे संबोधिण्यात येईल) अन्वये आरोपीविरुध्द गुन्हयाची नोंद करण्यात आली. प्रस्तुत गुन्हयाचा प्राथमिक तपास सहाय्यक पोलीस उप–निरीक्षक, दहेलीकर यांनी केला. त्यांनी मयत अमोल तालन याच्या मृतकदेहाचा मरणान्वेषण पंचनामा तयार केला. त्यानंतर, प्रस्तुत गुन्हयाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक, प्रमोद नागोरावजी पाटील यांनी केला. त्यांनी तहसीलदार, देवळी यांना घटनास्थळ पंचनाम्याकरीता पंच पुरविण्याबाबत पत्र दिले. त्यानंतर, त्यांनी दोन पंचासह घटनास्थळी जावुन फिर्यादी

हिने दाखविल्याप्रमाणे घटनास्थळ पंचनामा तयार केला. न्यायवैद्यक पथकही घटनास्थळी उपस्थित होते त्यांनी नमुने गोळा करुन आणि न्यायवैद्यक अहवाल दिला होता. त्यानंतर, त्यांनी आरोपीला अटक केली. त्यांनी, आरोपीने घटनेच्या वेळी घातलेले कपडे दोन पंचासमक्ष जप्त करुन जप्ती पंचनामा तयार केला.

५. सहाय्यक पोलीस निरीक्षक, प्रमोद नागोरावजी पाटील यांनी आरोपी अटकेत असताना कबुली देण्याची तयारी दर्शविल्याने, दोन पंच साक्षीदारांना बोलविले आणि दिनांक १२.०१.२०२२ रोजी, आरोपीला कोठडीमधुन बाहेर काढुन त्याचा कबुलीजबाब पंचांसमक्ष नोंदविला. त्यानंतर आरोपीच्या म्हणण्यानुसार ते, पंच, ईतर पोलीस कर्मचारी व आरोपी, असे पोलीस वाहनाने अहिल्याबाई समाज मंदिराच्या बाजुने रस्त्याकडील त्याच्या घरात आरोपीच्या सांगण्याप्रमाणे गेले आणि खोलीतील सज्जयावरुन एक लाकडी उभारी आरोपीने काढून सादर केली, ती त्यांनी पंचांसमक्ष जप्त करुन माल काढुन दिल्याचा पंचनामा तयार केला. त्यानंतर, त्यांनी मयताचे कपडे जप्ती पंचनाम्यानुसार दोन पंचांसमक्ष जप्त केले. त्यांनी पोलीस शिपाई, मनोज कांबळे यांनी आणलेले आरोपीचे दोन रक्ताचे नमुने, नखांचे तुकडे व केसांचे नमुने पंचांच्या समक्ष जप्त केले. त्यांनी, वैद्यकीय अधिकारी, कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम यांना जप्त हत्यार, लाकडी उभारी याबाबत क्वेरी करुन मिळण्याकरीता पत्र जारी केले व त्यानुसार त्यांच्याकडुन क्वेरी अहवाल प्राप्त केला.

६. सहाय्यक पोलीस निरीक्षक, प्रमोद नागोरावजी पाटील यांनी दिनांक १८.०१.२०२२ रोजी, प्रादेशिक न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळा, नागपुर यांना वस्तु आणि नमुने तपासणीसाठी पाठविले व त्यानुसार रासायनिक विश्लेषण अहवाल प्राप्त करुन घेतले. त्यांनी दिनांक ०६.०२.२०२२ रोजी, पंचांच्या उपस्थितीत सुषमा कडू हिच्याकडून जिओ कंपनीचा सिमकार्डसह ओप्पो कंपनीचा मोबाईल जप्ती

पंचनाम्यानुसार जप्त केला. त्याच दिवशी, त्यांनी पंचांच्या उपस्थितीत फिर्यादी अर्चना तालन हिच्याकडुन जिओ कंपनीचा मोबाईल जप्ती पंचनाम्यानुसार जप्त केला. त्यांनी दिनांक १७.०२.२०२२ रोजी, सुषमा कडू आणि मयत अमोल तालन यांच्या मोबाईल फोनचे सी.डी.आर. आणि एस.डी.आर. मिळवण्यासाठी पोलीस अधिक्षक, वर्धा यांना पत्र पाठविले. त्यांनी दिनांक २४.०२.२०२२ रोजी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, देवळी यांना घटनेच्या वेळी विद्युतपुरवठा होता किंवा नव्हता याची माहिती मिळण्याकरीता पत्र पाठविले आणि त्याबाबतची माहिती प्राप्त करुन घेतली. त्यांना तपासादरम्यान एकुण चार रासायनिक विश्लेषणाचे अहवाल प्राप्त झाले, ते अभिलेखावर सादर केले. त्यांनी साक्षीदारांची बयाने साक्षीदारांच्या सांगण्यानुसार नोंदविली. त्यांनी तपासकाम पूर्ण झाल्यानंतर आरोपीविरूध्द पुरेसा पुरावा प्राप्त झाल्याने त्याच्याविरूध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३०२ अन्वये प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पुलगाव यांच्या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

७. संहितेचे कलम ३०२ अन्वये दंडनीय असणा–या खटल्याचे कामकाज चालविण्याचे अधिकार केवळ सत्र न्यायालयास असल्याने, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पुलगाव यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २०७ ची पूर्तता करून सदरचा खटला चालविण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २०९ अन्वये सत्र न्यायालय, वर्धा यांच्याकडे दिनांक १२.०५.२०२२ रोजीच्या आदेशान्वये वर्ग केला.

८. प्रस्तुत प्रकरणी आरोपी सत्र न्यायालयात हजर झाल्यानंतर दिनांक ०५.०७.२०२३ रोजी आरोपीविरुध्द संहितेचे कलम ३०२ अन्वये दोषारोप (निशाणी क्रमांक २४) ठेवून आरोप निश्चित करण्यात आले. सदर दोषारोप आरोपीला वाचून दाखवून, त्याच्या भाषेत समजावून सांगण्यात आले. आरोपीने

त्याच्यावरील आरोप नाकारुन संपरिक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

९. अभियोगपक्षातर्फे प्रस्तुत प्रकरणी एकूण तेरा साक्षीदार तपासल्यानंतर, गुन्ह्यात गोवणा–या पुराव्याचे पुष्टीकरण घेण्याकरीता फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वये आरोपीचा जबाब नोंदविण्यात आला. आरोपीने त्याला खोटया गुन्हयात गोवण्यात आले असल्याचा बचाव घेतला आहे. त्याचप्रमाणे आरोपीने त्याच्या बचावार्थ सचिन मारोतराव कडू (सा.क्र.१) (नि.क्र.१०७) यास तपासलेले आहे.

१०. निर्णयाकरीता उपस्थित झालेले मुद्दे, त्यावरील माझ्या निष्कर्षांसह खालीलप्रमाणे आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अमोल बाळकृष्ण तालन याचा मृत्यु, मनुष्यवध असल्याचे अभियोगपक्ष शाबीत करतो काय ? | होकारार्थी. |
| **२.** | आरोपीने अमोल बाळकृष्ण तालन याची हत्या केल्याचे अभियोगपक्ष शाबीत करतो काय ? | नकारार्थी. |
| **३.** | आरोपीने गुन्हा केला काय ? असल्यास कोणता ? | नकारार्थी. |
| **४.** | काय आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## – का र ण मि मां सा –

११. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. आर. घुडे यांनी युक्तिवाद केला की, साक्षीदारांनी ठोस आणि विश्वासार्ह पुरावा दिलेला आहे. बचावपक्षाने साक्षीदारांच्या उलटतपासणीमध्ये कोणतीही ठळक तफावत किंवा विरोधाभास उघडकीस आणलेला नाही. बचावपक्षाने

त्यांच्या साक्षीवर शंका निर्माण करण्यासारखे काहीही दाखवून दिलेले नाही. त्यामुळे अभियोगपक्षाने आरोपीविरुद्धचा गुन्हा संशयापलिकडे जावून सिद्ध केला आहे. याप्रकरणी, अभियोगपक्षाने घटना घडली, घटनेच्या वेळी मृतककास गंभीर दुखापती झाल्या, मृतककाने तोंडी मृत्यूपुर्व निवेदन दिले; सदरचा पुरावा भारतीय पुरावा कायद्यानुसार स्वतंत्र पुरावा ठरतो, कारण मृत्यूसमयी कोणीही खोटे कथन करीत नाही असे न्यायतत्व आहे व त्यानंतर जखमीचा रुग्णालयात नेतेवेळी मृत्यू झाला, या बाबी निःसंशयपणे सिध्द केलेल्या आहेत. साक्षीदारांचा न्यायालयासमोरील पुरावा बचावपक्षाने संपूर्णतः आव्हानीत न केल्यामुळे आव्हानविरहीत राहीलेला आहे. ईतकेच नव्हे तर, साक्षीदारांनी अभियोगपक्षाच्या कथनास पुष्टी दिलेली आहे. काही विसंगत बाबी जरी अभियोगपक्षाने सिध्द केलेल्या नसल्या तरी अभियोगपक्षाचा संपुर्ण खटला झिडकारणे संयुक्तिक होणार नाही, कारण आरोपीने गंभीर स्वरुपाचा गुन्हा केल्याची बाब संशयापलिकडे जावुन अभियोगपक्षातर्फे सिध्द करण्यात आलेली आहे. सबब, आरोपीला कायद्यानुसार गुन्हयाचे स्वरुप पाहून कठोर शिक्षा ठोठावण्यात यावी. याप्रकरणी, खालील नमूद केलेल्या न्यायनिर्णयामधील न्यायतत्व प्रस्तुत मामल्याच्या अनुषंगाने अंगीकारणे अधिक सोईचे होईल, त्यामुळे अभियोगपक्ष खालील न्यायनिर्णयांचा आधार घेत आहे.

१) **लक्ष्मीबाई (मयत) तर्फे कायदेशीर वारस आणि इतर –विरुध्द– भगवंतबुवा (मयत) तर्फे कायदेशीर वारस, प्रकाशीत २०१३ ऑल एम.आर. (फौजदारी) ४२०,**

२) **पोपट खांडु पिसाळ –विरुध्द– महाराष्ट्र शासन, प्रकाशीत २०१५(२) ऑल एम.आर. (फौजदारी) १४०६,**

३) **जगबीर सींग –विरुध्द– राज्य (एन.सी.टी. दिल्ली), प्रकाशीत २०१९ ऑल**

एस.सी.आर. (फौजदारी) १९६६,

१२. याउलट, आरोपीतर्फे अधिवक्ता श्रीमती ए.डी.देशपांडे यांनी युक्तिवाद केला की, साक्षीदारांचा पुरावा नैसर्गिक, सातत्यपूर्ण व विश्वासार्ह नाही. आरोपीविरुध्द ठोस, सबळ तथा प्रत्यक्षदर्शी, थेट वैद्यकीय/वैज्ञानिक पुरावा आणण्यात अभियोगपक्षाला अपयश आलेले आहे. अभियोगपक्षाने आधार घेतल्याप्रमाणे संशयविरहीत पुरावा मृतककाच्या तोंडी मृत्यूपुर्व निवेदनाच्या अनुषंगाने अभिलेखावर आणलेला नाही. याउलट, मयत अमोल हा दारुच्या अंमलाखाली होता, ही बाब अभियोगपक्षाचे साक्षीदाराचे पुराव्यात प्रकर्षाने आलेली आहे. तसेच मृत्यूसमयी मृतककाची शारिरीक तथा मानसिक स्थिती सुयोग्य होती याबाबतचा कोणताही पुरावा नाही. फिर्यादी तथा अन्य साक्षीदार हे हितसंबंधी साक्षीदार असून त्यांची साक्ष विश्वासार्ह नाही, साक्षीदारांच्या न्यायालयापुढील साक्षीमध्ये महत्त्वाच्या विसंगती आहेत. परिस्थितीजन्य पुराव्याची साखळी अभियोगपक्षाने सबळ पुराव्यानिशी जोडलेली नाही. त्यामुळे अभियोगपक्षाचा खटला संशयास्पद व अविश्वसनीय आहे. आरोपीविरुध्द थेट गुन्हयात गोवणारा कोणताही पुरावा तथा घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही, सबब आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे.

१३. या पार्श्वभूमीवर, सहाय्यक सरकारी अभियोक्ता आणि आरोपीच्या वकिलांनी मांडलेल्या युक्तिवादांच्या आधारे साक्षीदारांच्या साक्षीचे प्रतिपरीक्षेच्या प्रकाशात परीक्षण करणे आवश्यक आहे.

<u>मुद्दा क्रमांक १ बाबत</u> :–

१४. या प्रकरणातील मृतककाचा मृत्यू हा मनुष्यवध आहे हे सिध्द

करण्यासाठी अभियोग पक्षाने डॉ. प्रवीण रामभाऊ झोपाटे (सा.क्र.१२) (नि.क्र.८३) वर तपासले आहे. त्यांनी त्यांच्या साक्षीत सांगितले की, त्यांची शैक्षणिक पात्रता एम.बी.बी.एस., एम.डी. (फॉरेन्सिक मेडिसिन) आहे. ते महात्मा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, सेवाग्राम येथे सन २००८ पासून सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. दिनांक १०.०१.२०२२ रोजी, ते कर्तव्यावर उपस्थित असताना त्यांना पोलीस स्टेशन, पुलगाव येथून मृतकदेहाचे शवविच्छेदन करण्याबाबत पत्र (नि.क्र.८४/सा.क्र.१२) प्राप्त झाले. त्यांनी मृतकदेहाचे शवविच्छेदन दिनांक १०.०२.२०२२ रोजी, दुपारी १२.१० ते २.१५ वाजेपर्यंत केले. मृताच्या चुलत भावाने, निलेश देवरावजी तालन याने दिलेल्या इतिहासानुसार, मृतास आरोपीने दिनांक ०९.०१.२०२२ रोजी सायंकाळी सुमारे ७.३० वाजता मारहाण केली होती.

१५. शवविच्छेदनात त्यांना खालील बाह्य जखमा आढळल्या:

१) कपाळ–पार्श्वभागीय भागातील मध्य तृतीयांशावर ६ से.मी. × १.५ से.मी. × हाडापर्यंत खोल, उभ्या दिशेने असलेली ठेचलेली व फाटलेली जखम. जखमेचे कडे ठेचलेले व अनियमित. त्यातून प्रचंड रक्तस्त्राव झालेला दिसून आला. २) खालच्या ओठाखाली डाव्या हनुवटीवर 2 से.मी. खाली, १.५ से.मी. × हाडाच्या पोकळीपर्यंत खोल अशी भेदक जखम. कडे अनियमित. त्यातून प्रचंड रक्तस्त्राव झालेला दिसून आला. ३) डाव्या बाजूच्या खालच्या ओठावर ३ से.मी. × १ से.मी. × त्वचेखाली खोल अशी ठेचलेली व फाटलेली जखम. आडव्या दिशेने. कडे अनियमित. वरच्या कडेला बेव्हलिंगचे पुरावे दिसून आले. ४) छातीच्या खालच्या तृतीयांशावर दोन ठराविक खरचटणे, अनुक्रमे ९ से.मी. × १ से.मी. व ६ से.मी. × ०.८ से.मी., आडव्या व तिरक्या दिशेने. रंग लालसर. ५) डाव्या छातीवर अनेक ठराविक

ठेचलेल्या जखमा, आकार १ से.मी. × ०.५ से.मी., ०.८ से.मी. × ०.३ से.मी., ०.५ से.मी. × ०.३ से.मी., तिरक्या दिशेने खाली. रंग लालसर. वरची जखम डाव्या स्तनाग्राखाली ४ से.मी. अंतरावर. ६) उजव्या खांद्याच्या सांध्यावर ४ से.मी. × ३ से.मी. आकाराची ठेचलेली जखम. रंग लालसर. बाह्य तपासणी व पल्पेशन मध्ये त्यांना पुढील जखमा आढळल्या: १. छातीच्या पुढील–मध्य भागावर दोन्ही बाजूंच्या दुसऱ्या ते चौथ्या बरगड्यांचे फ्रॅक्चर व मॅन्युब्रियम स्टर्नमचे फ्रॅक्चर पल्पेशन मध्ये आढळले.

१६. मस्तक, वक्ष व उदर तपासणीनंतर त्यांना खालील आंतरंग जखमा आढळल्या : (१) मस्तक : कपाल उघडल्यावर दोन्ही फ्रंटो–पार्श्वभागीय भागात सबगॅलियल हेमॅटोमा आढळले. (२) कवटी – शिरोभाग व तळभाग : कवटीच्या मध्य तृतीयांश भागात सॅजिटल स्यूचरवर रेषीय भेग आढळली. ती फ्रंटल हाडापासून पुढे व मागे पार्श्व हाडापर्यंत पसरलेली असून लांबी ९ से.मी., उभी दिशेने आहे. (३) मेंदू : मेनिंजेस अखंड आहेत. सबड्युरल रक्तस्राव उजव्या फ्रंटो–पार्श्वभागीय लोबवर दिसून आला. मेंदूचा पदार्थ फिकट व सूजलेला आहे. मेंदूचे वजन १३०० ग्रॅम. वक्ष : (१) भित्ती, बरगड्या, उपास्थी : दुसऱ्या ते चौथ्या बरगडींचे द्विपार्श्वीय पुढील–मध्य भागावर फ्रॅक्चर व मॅन्युब्रियमचे फ्रॅक्चर आढळले. फ्रॅक्चरच्या भागातील इंटरकॉस्टल जागेत रक्तस्रावाचे पुरावे दिसून आले. (२) प्ल्युरा : दोन्ही बाजूंच्या प्ल्युरामध्ये हृदयावरणाच्या पुढील भागाच्या वरच्या तृतीयांशावर फाटे आढळले. सुमारे १०० मि.ली. हेमोथोरॅक्सचे पुरावे दिसून आले. (३) स्वरयंत्र, श्वासनलिका व श्वासनलिकांचे फाटे : फिकट. आत रक्तमिश्रित स्त्राव दिसून आला. (४ व ५) उजवे व डावे फुफ्फुसे : दोन्ही फुफ्फुसे फिकट असून पुढील भागावर विविध आकाराच्या ठेचलेल्या जखमा आढळल्या, आकार ४ × २ से.मी. ते २ × १ से.मी. पर्यंत. डाव्या फुफ्फुसाचे वजन

३५० ग्रॅम व उजव्या फुफ्फुसाचे वजन ३०० ग्रॅम. (६) हृदयावरण : अखंड. पोकळीत सुमारे ५० मि.ली. रक्त आढळले. (७) हृदय : हृदय आकार व स्वरूपाने सामान्य. वजन २१० ग्रॅम. (८) मोठ्या रक्तवाहिन्या : अखंड. अथेरोस्क्लेरोसिसचे कोणतेही पुरावे आढळले नाहीत. (९) अतिरिक्त नोंद : शून्य.

१७. तपासणीदरम्यान त्यांना खालील जखमा देखील आढळल्या. उदर : भित्ती : अखंड. पेरिटोनियम : अखंड, पोकळी : सर्व अवयव त्यांच्या जागी आहेत. पोकळीत सुमारे ३०० मि.ली. ताजे रक्त आढळले. हेमोपेरिटोनियमचे निदर्शक. मुखगुहा, दात, जीभ व घशाचा भाग : मुखगुहेत कोणतेही परकीय पदार्थ आढळले नाहीत. दात अखंड, १६/१६. अन्ननलिका : आकार व स्वरूपाने सामान्य. छेदावर फिकट. जठर व त्यातील पदार्थ : सुमारे १०० मि.ली. चहा रंगाचा द्रव, कोणताही विशेष वास नाही. जठरातील श्लेष्मल त्वचा फिकट, छेदावर अल्सर नाही. लहान आतडे व त्यातील पदार्थ : सुमारे १०० मि.ली. चहा रंगाचा द्रव, कोणताही विशेष वास नाही. छेदावर श्लेष्मल त्वचा फिकट. मोठे आतडे व त्यातील पदार्थ : मलमूत्राने फुगलेले. यकृत व पित्ताशय : यकृत आकाराने सामान्य. उजव्या लोबच्या पुढील भागावर ९ से.मी. × ०.५ से.मी. × ऊतकापर्यंत खोल अशी आडवी रेषीय फट आढळली. छेदावर यकृत ऊतक फिकट. वजन १३५० ग्रॅम. त्यास चिकटलेले अल्प रक्त आढळले. अग्न्याशय व अधिवृक्क ग्रंथी : कोणतेही गाठ, कॅल्सिफिकेशन किंवा रक्तस्राव नाही. छेदावर फिकट. प्लीहा : आकार व स्वरूपाने सामान्य. छेदावर ऊतक फिकट. वजन १३० ग्रॅम. मूत्रपिंड : दोन्ही मूत्रपिंडांचे आवरण अखंड. आकार व स्वरूपाने सामान्य. छेदावर ऊतक फिकट. उजवे मूत्रपिंड = १३० ग्रॅम, डावे मूत्रपिंड = १२० ग्रॅम. मूत्राशय : अखंड, रिकामे. श्लेष्मल त्वचा फिकट. जननेंद्रिये : सामान्य. अतिरिक्त नोंद : मृत्यूचा कालावधी व शेवटच्या भोजनाबाबत जठरातील पदार्थांवरून

कोणतेही विशेष निदर्शन नाही.

१८. त्यांनी त्यांच्या पुराव्यात पुढे सांगितले की, वरील सर्व जखमा मृत्यूपूर्व व ताज्या होत्या. त्यांनी अंतर्गत अवयव (विसेरा) गोळा करून रक्त, रक्तगट व क्रॉस मॅचिंगसाठी रक्त, कपाल केस व नखांचे तुकडे रासायनिक विश्लेषणासाठी जतन केले. तसेच मृतकदेहावरील कपडे – कमांडो बरमुडा (खाकी रंग, पांढऱ्या पट्ट्यांसह) रक्ताने माखलेले, नेव्ही ब्लू अंडरवेअर रक्ताने माखलेले, लाल गमछा (दुपट्टा) रक्ताने माखलेला व लाल चादर (डिझाईन असलेली) रक्ताने माखलेली – हे सर्व रासायनिक विश्लेषणासाठी जतन करून सीलबंद, लेबल करून संबंधित पोलीस शिपायाकडे विसेरा फॉर्म व फॉर्म–दोन सहित सुपूर्द केले. त्यांनी असे मत व्यक्त केले की, मृत्यूचे कारण म्हणजे "बहुजखमी, रक्तस्राव व शॉक, मारहाणीच्या प्रकरणात (अप्राकृतिक)". त्यानुसार, त्यांनी शवविच्छेदन अहवाल (नि.क्र.८४/सा.क्र.१२) तयार केला. विसेरा फॉर्म व फॉर्म–दोन (एकूण दोन) यांच्या प्रती (आर्टीकल–अ ते क/सा.क्र.१२) या देखील त्याच असून त्यावर त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

१९. त्यांनी पुढे सांगितले की, दिनांक १४.०१.२०२२ रोजी, ते कर्तव्यावर होतो. त्या दिवशी, त्यांना पोलीस स्टेशन, पुलगाव येथून चौकशीपत्र (नि.क्र.८६/सा.क्र.१२) प्राप्त झाले, त्यासोबत सीलबंद लाकडी लाठी (लाकडी उभारी) एन.पी.सी. सचिन ठाकरे यांनी आणून दिली होती. ती शवविच्छेदन अहवालाच्या प्रतीसह प्राप्त झाली. त्यानुसार, त्यांनी सील उघडून लाकडी उभारीचे परीक्षण केले. परीक्षणात मला पुढील बाबी आढळल्या : (१) शस्त्राचे नाव : लाकडी लाठी (लाकडी उभारी) हे कठीण व बोथट स्वरूपाचे शस्त्र आहे. (२) शस्त्राचे वर्णन : लांबट, बेलनाकार, लाकडी रंगाची लाठी, वजन १ किलो. एका टोकास बोथट असून दुसऱ्या टोकास Y आकार असून दोन्ही टोक बोथट आहेत. संपूर्ण लाठीवर

ठिकठिकाणी अनेक डेंट्स आढळले. (३) शस्त्राचे परिमाण : लाकडी लाठीची एकूण लांबी ३३.५ इंच. खालच्या टोकास परिघ ६ इंच, वरच्या भागास ५.५ इंच व मध्यभागी ५.९ इंच. (४) शस्त्रावरील परकीय पदार्थ/डाग : लाठीवर ठिकठिकाणी अनेक लालसर रंगाचे रक्तासारखे डाग आढळले. शस्त्राची ओळख पटविण्याच्या उद्देशाने त्यांनी लाठीच्या मध्यभागी पिनने “PRZ” अशी खूण व दिनांक १५.०१.२०२२ लिहून स्वाक्षरी केली.

२०. त्यांनी पुढे सांगितले की, (१) तपास यंत्रणेने विचारलेले प्रश्न : प्रश्न क्र.१ – मृताच्या शरीरावर असलेल्या जखमा जप्त केलेल्या शस्त्राने (लाकडी लाठी/लाकडी उभारी) होऊ शकतात काय ? प्रश्न क्र.2 – शवविच्छेदन अहवालात नमूद केलेल्या जखमा कोणत्या प्रकारच्या शस्त्राने होऊ शकतात ?

त्यांचे मत : प्रश्न क्र.१ : अमोल बालकृष्ण तळण, रा. येसगाव यांच्या शरीरावर असलेल्या जखमा जप्त केलेल्या लाकडी लाठीने किंवा अशा प्रकारच्या इतर शस्त्राने होऊ शकतात. प्रश्न क्र.२ : शवविच्छेदन अहवालात नमूद केलेल्या जखमा कठीण व बोथट शस्त्राने होऊ शकतात. त्यानुसार, त्यांनी चौकशी अहवाल व लाकडी उभारीचे रेखाटन (नि.क्र.८७/सा.क्र.१२) तयार केले. शस्त्राचे परीक्षण पूर्ण झाल्यानंतर, त्यांनी ते सीलबंद करून लेबल लावले व संबंधित पोलीस स्टेशन, पुलगाव येथील कर्मचाऱ्यांकडे सुपूर्द केले. शवविच्छेदन अहवाल (नि.क्र.८५/सा.क्र.१२) मध्ये नमूद केलेल्या जखमा लाकडी लाठी (उभारी) वापरल्यामुळे होऊ शकतात. त्यांनी लाकडी लाठी (उभारी) (आर्टीकल क्र.–१) ओळखली. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये त्यांनी मान्य केले की, अमोल यांचा मृत्यू कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम येथे झाला. त्यांनी हे देखील मान्य केले की, (नि.क्र.८४/सा.क्र.१२) या मागणीपत्र प्राप्त होईपर्यंत शवविच्छेदन करण्यात आले नव्हते आणि रासायनिक

विश्लेषण अहवाल (नि.क्र.७६) मध्ये इथिल अल्कोहोल उपस्थित होते. त्यांनी त्याच्या बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये सांगितले की, मयत रुग्णालयात दाखल असताना त्यांनी त्याची वैद्यकीय तपासणी केलेली नव्हती, त्यांनी केवळ शवविच्छेदन केले आहे. मयताच्या मृतकदेहावर आढळून आलेल्या फाटल्याच्या (lacerated) जखमा हया पडल्यामुळे होऊ शकत नाहीत, कारण अशा परिस्थितीत केवळ एकच जखम होणे अपेक्षित असते. तथापि, मयताच्या मृतकदेहावर अनेक फाटल्याच्या (lacerated) जखमा आढळून आल्या आहेत. शवविच्छेदन अहवाल (नि.क्र.८५/सा.क्र.१२) आणि क्वेरी अहवाल (नि.क्र.८७/सा.क्र.१२) यांचा परस्परसंबंध स्पष्टपणे दर्शवितो की, सदरचा मृत्यू हा मनुष्यवध आहे. म्हणुन, मी मुद्दा क्रमांक १ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दे क्रमांक २ व ३ बाबत</u> :–**

२१. उपरोक्त मुद्यांवरचा पुरावा एकसारखा आणि परस्परांशी निगडीत असल्यामुळे, त्यांना एकत्रितपणे विचारात घेतले जात आहे.

२२. या प्रकरणात कोणताही थेट पुरावा उपलब्ध नाही आणि प्रकरण केवळ परिस्थितिजन्य पुराव्यावर आधारित आहे. परिस्थितिजन्य पुराव्याबाबतचा कायदा स्पष्ट आणि स्थिर आहे. जेव्हा एखादा खटला परिस्थितिजन्य पुराव्यावर आधारलेला असतो, तेव्हा दोषारोपासाठी ज्या परिस्थितींवरून निष्कर्ष काढला जातो, त्या परिस्थिती ठोस आणि दृढपणे सिद्ध झालेल्या असाव्यात. त्या परिस्थितींना निश्चित प्रवृत्ती असावी, जी आरोपीच्या दोषाकडे स्पष्टपणे आणि चुकविण्याची शक्यता नसलेल्या पद्धतीने निर्देश करते. सर्व परिस्थिती एकत्रितपणे अशी अखंड साखळी निर्माण करतात की, मानवी संभाव्यतेच्या मर्यादेतून कोणताही

अन्य निष्कर्ष निघू शकत नाही, आणि गुन्हा आरोपीनेच केला आहे व इतर कोणीही नाही, असा निष्कर्ष अपरिहार्य ठरतो.

२३. परिस्थितिजन्य पुरावा दोषसिद्धीस आधार देण्यासाठी संपूर्ण असावा आणि आरोपीच्या दोषाशिवाय इतर कोणत्याही गृहितकाने त्याचे स्पष्टीकरण देता येणार नाही, असा असावा. परिस्थितिजन्य पुरावा केवळ आरोपीच्या दोषाशी सुसंगत असावा एवढेच नव्हे, तर तो आरोपीच्या निर्दोषत्वाशी विसंगत असावा. परिस्थितिजन्य पुराव्याबाबतच्या कायदेशीर स्थितीच्या प्रकाशात, या न्यायालयाला हे तपासावे लागेल की, प्रस्तुत प्रकरणातील परिस्थितिजन्य पुरावा कायद्याच्या आवश्यक अटींची पुर्तता करतो का? त्यासाठी या प्रकरणी अभियोगपक्षातर्फे आलेल्या पुराव्याची छाननी करणे उचित ठरेल.

२४. अभियोगपक्षाचा खटला मुख्यत्वे फिर्यादीसमोर मृतकाने केलेल्या कथित तोंडी मृत्युपूर्व निवेदनावर आधारित आहे, तसेच जय (सा.क्र.२) याने आरोपीस घटनास्थळाजवळ पाहिल्याचा दावा केला आहे, आणि मृतक व आरोपीच्या मुलीमध्ये असलेल्या संबंधांमुळे उद्भवलेल्या कथित हेतूवर आधारलेला आहे. प्रस्तुतच्या प्रकरणी, प्रत्यक्ष हल्ला पाहणारा कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसल्याची बाब निर्विवाद आहे. परिणामी, संपूर्ण अभियोगपक्षाचा खटला परिस्थितिजन्य पुराव्यावर आधारित आहे. कायद्याच्या सिद्धांताप्रमाणे, जेव्हा अभियोगपक्ष परिस्थितिजन्य पुराव्यावर अवलंबून असतो, तेव्हा प्रत्येक परिस्थिती ठामपणे सिद्ध झालेली असावी, प्रत्येक परिस्थिती ही केवळ आरोपीच्या दोषारोपाशी सुसंगत असावी, आणि सर्व परिस्थिती एकत्रितपणे अशी अखंड साखळी तयार करावी की, जी आरोपीच्या निर्दोषत्वाशी सुसंगत असलेल्या प्रत्येक वाजवी गृहितकाला नाकारेल. जर त्या साखळीतील कोणतीही कडी हरवलेली असेल किंवा संशयास्पद वाटत

असेल, तर आरोपीस संशयाचे लाभाचा अधिकार प्राप्त होतो.

२५. अभियोगपक्षाने, मृतकक अमोल तालन याने तथाकथित घटनेनंतर घरात पोहोचताच केलेल्या कथित तोंडी मृत्युपूर्व निवेदनावर लक्षणीय भर दिला आहे. तोंडी मृत्युपूर्व निवेदनावर कार्यवाही करण्यास कोणतेही कायदेशीर प्रतिबंध नाहीत. तथापि, जेव्हा असे निवेदन निकटवर्तीय नातेवाईकांसमोर केले जाते, तेव्हा गैरसमज, अलंकरण किंवा अनावधानाने अतिशयोक्ती, वाढीव विसंगती होण्याची शक्यता असल्यामुळे त्याची कठोर छाननी व स्वतंत्र परिस्थितींमधून काळजीपूर्वक पुष्टी होणे आवश्यक असते. लिखित मृत्युपूर्व निवेदन हे दंडाधिकारी किंवा वैद्यकीय अधिकारी यांनी नोंदवलेले असल्यास त्यास अधिक प्रमाणिकता प्राप्त होते; परंतु तोंडी मृत्युपूर्व निवेदन हे पूर्णपणे त्या व्यक्तीच्या स्मरणशक्ती व सत्यनिष्ठेवर अवलंबून असते, ज्याने ते ऐकल्याचा दावा केलेला असतो. त्यामुळे, अभियोगपक्षाचे उपरोक्त कथनाच्या पुष्टर्थ फिर्यादी आणि जय (सा.क्र.२) यांच्या पुराव्याची पडताळणी करणे उचित ठरेल.

२६. अभियोगपक्षाने फिर्यादी अर्चना अमोल तालन (सा.क्र.१) (नि.क्र.३०) वर तपासले आहे. तिने तिच्या न्यायालयासमोरील साक्षीत सांगितले की, मयत अमोल तालन हा तिचा पती असुन सुषमा कडू (सा.क्र.११) ही आरोपीची विवाहीत मुलगी आहे. तिने पुढे सांगितले की, दिनांक ०९.०१.२०२२ रोजी, रात्री ८.०० वाजताच्या दरम्यान, ती घरामध्ये असताना तिचा पती जखमी अवस्थेत आला. तिने पतीला काय झाले असे विचारले असता तिच्या पतीने सांगितले की, त्याचे आरोपीच्या मुलीसोबत असलेल्या अनैतिक संबंधाचे कारणावरुन त्याला आरोपीने काठीने डोक्यात मारले. तिने पाहीले असता तिच्या पतीला डोक्याला, छातीवर व गालावर दुखापती झाल्या होत्या. जय तालन याने आरोपीला पाण्याच्या टाकीजवळुन

पळून जाताना पाहीले, असे सांगितले. त्यानंतर, तिने तिचे भासरे दिवाकर तालन यांना माहिती दिली व बोलवुन घेतले आणि तिच्या पतीला जखमी अवस्थेत उपचारासाठी सामान्य रुग्णालय, वर्धा येथे आणले. त्यानंतर, सेवाग्राम रुग्णालयात दाखल करीत असताना तिचे पती मरण पावले. त्यामुळे तिने पोलीस स्टेशनला जावून आरोपीविरुध्द तक्रार (नि.क्र.३१) नोंदविली. सदरच्या तकारीवरुनच पोलीसांनी छापील प्रथम खबर (नि.क्र.३२) तयार केली.

२७. फिर्यादी अर्चना (सा.क्र.१) हिने तिच्या साक्षीत पुढे सांगितले की, तिने पोलीसांना घटनास्थळ दाखविले होते आणि पोलीसांनी पाहणी करुन घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. तिने जय तालन यास तिच्या पतीची चप्पल आणण्यासाठी पाण्याच्या टाकीजवळ पाठविले होते. तो थोडया वेळाने चप्पल घेवुन परत आला आणि आरोपीला जनावराच्या गोठयातून काठीसह पळून जाताना पाहील्याचे तिला सांगितले. तिच्या साक्षीत तिने पुढे सांगितले की, घटनेच्या आठ दिवस आधी, सुषमा कडू हिने तिच्या पतीला फोन केला होता आणि तिने त्यांचे बोलणे ऐकले होते. त्यावेळी सुषमा हिने हातावर चिरे मारले, आता मी मरत आहे आणि तिच्या पतीला हार, जोडवे आणि सिंदूर आणण्यास सांगितले होते. त्यानंतर, तिने तिच्या पतीच्या मोबाईलमध्ये वॉटसअपवर हातावर चिरे मारल्याचे फोटो पाहीले होते आणि त्यामुळे तिला तिचे पती आणि सुषमा यांचे प्रेमसंबंध आहे याची खात्री झाली होती. तिने पुढे सांगितले की, तिच्या पतीचा ओप्पो कंपनीचा मोबाईल फोन पोलीसांनी जप्ती पंचनामा (नि.क्र.३३) अन्वये जप्त केला होता.

२८. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये फिर्यादीने मान्य केले की, तिने तिच्या पतीच्या मोबाईलमध्ये चिरे मारल्याचे छायाचित्र पाहीले, त्यामध्ये कोणाचाही चेहरा दिसत नव्हता. तसेच फिर्यादीने तिच्या पतीला दारुचे

व्यसन असल्याचे तथा तिने प्रत्यक्ष घटना पाहीली नसल्याचे स्पष्टपणे मान्य केलेले आहे.

२९. अभियोगपक्षाने साक्षीदार जय राजेंद्र तालन (सा.क्र.२) (नि.क्र.३५) वर तपासले आहे. त्याने त्याच्या न्यायालयासमोरील साक्षीत सांगितले की, मयत अमोल तालन हे त्याचे काका होते. दिनांक ०९.०१.२०२२ रोजी, रात्री ८.०० वाजताच्या दरम्यान, तो व त्याची आजी अमोल तालन याचे घराजवळ होते. त्यावेळी त्याचे काका मंदिराकडुन जखमी अवस्थेत घरी चालत आले आणि घरामध्ये गेले. त्याची काकू फिर्यादी हिने जखमी अमोलला काय झाले असे विचारले. त्यावेळी अमोल तालनने सांगितले की, पाण्याच्या टाकीजवळ आरोपीने त्याला काठीने त्याची मुलगी सुषमा हिचेसोबत प्रेमसंबंधाचे कारणावरुन मारहाण केली. फिर्यादीने त्याला अमोल तालनची चप्पल आणण्यासाठी पाण्याच्या टाकीजवळ पाठविले. तो पाण्याच्या टाकीजवळ गेला तेथे चप्पला अस्ताव्यस्त पडलेल्या होत्या. तो चपला घेवुन परत येत असताना, आरोपी त्याला दिलीप गावंडे याच्या जनावराच्या गोठयातून हातात काठी घेवून पळुन जातांना विद्युत खांबाच्या लाईटच्या उजेडात त्याने पाहीले. त्यावेळी आरोपीने फिकट निळया रंगाचा शर्ट आणि हिरवट काळपट पॅन्ट घातलेली होती. तो चप्पल घेवुन परत आला, त्यावेळी घरामध्ये निलेश तालन, गोकुळ तालन, दिवाकर तालन आणि अंकुश भडके हजर होते. त्याने त्यांना सांगितले की, चप्पल घेवुन परत येत असताना त्याने आरोपीला काठीसह पळून जातांना पाहीले आहे.

३०. साक्षीदार जय तालन (सा.क्र.२) याने त्याच्या साक्षीत पुढे सांगितले की, त्याचे काका अमोल तालन याला दिवाकर तालन यांच्या मारुती ओमनी गाडीतुन सेवाग्राम दवाखान्यात उपचारासाठी नेले. पुढे त्याने कथन केले आहे की, उपचारादरम्यान त्याचा काका अमोल दुस–या दिवशी मरण पावला आहे. त्याला

त्याचे नातेवाईकाकडुन समजले की, त्याचा काका अमोल याचे आरोपीची विवाहीत मुलगी सुषमा हिच्यासोबत अनैतिक संबंध होते. सदरची बाब आरोपी व इतर लोकांना माहिती झाली, यामुळे आरोपीने अमोलला काठीने डोक्यावर, तोंडावर आणि छातीवर मारहाण करुन गंभीर जखमी केले आणि त्याचा खून केला. आरोपीने घटनेच्या वेळी परीधान केलेले कपडे फिक्कट निळया रंगाचा शर्ट आर्टीकल–अ हिरवट काळपट रंगाची पॅन्ट आर्टीकल–ब आणि काठी आर्टीकल–सी त्याने ओळखली.

३१. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये सदर साक्षीदाराने सांगितले की, अमोल जखमी होवून आल्यानंतर घरामध्ये पाच ते दहा मिनीटे होता, अमोल घरामध्ये होता, तेव्हा तो पुर्ण वेळ त्याठिकाणी हजर होता. घटनेच्या वेळी आरोपीने फिकट निळया रंगाचा शर्ट आणि काळपट हिरवे पॅन्ट घातले होते असे त्याने पोलीसांना सांगितले होते, परंतु तसे त्याच्या बयानात का नमूद करण्यात आले नाही याचे कारण तो सांगु शकत नाही. एकीकडे हा साक्षीदार आरोपीने घटनेच्या वेळी फिकट निळया रंगाचा शर्ट आणि काळपट हिरवे पॅन्ट घातले होते, असे नमूद करतो तर दुसरीकडे त्याला आरोपीचे कपडे ओळखण्यासाठी पोलीसांनी कधीही बोलविले नसल्याचे सांगतो. मात्र, सदरची बाब त्याचे बयानात का नमूद नाही याबाबत तो काणतेही कारण सांगु शकत नसल्याचे मान्य करतो. याउलट, तपासी अधिकारी यांनी त्यांच्या बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये जय तालन (सा.क्र.२) याचे बयान नोंदवितांना त्याला फिकट निळया रंगाचा शर्ट आणि हिरव्या काळया रंगाची पॅन्ट दाखवण्यात आली होती, असे सांगितले नसल्याचे मान्य केलेले आहे. यावरुन सदर साक्षीदाराच्या पुराव्यामध्ये बयानात नमूद न केलेले कपडयांविषयीचे कथन हा महत्वाचा विरोधाभास तथा विसंगती असुन भारतीय पुरावा कायद्याप्रमाणे वाढीव स्वरुपाची असल्याचे दिसुन येते व सदरची उणीव ही अभियोगपक्ष सिध्द करु

शकलेला नाही. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये पुढे त्याने मान्य केले की, पोलीसांनी त्याला आरोपीचे कपडे आणि काठी ओळखण्यासाठी पोलीस स्टेशनला बोलविले नव्हते. त्याने हे देखील मान्य केले की, अमोल तालन याला दारु पिण्याचे व्यसन होते आणि घटनेच्या दिवशी अमोलने मद्य प्राशन केले होते.

३२. सदर प्रकरणात फिर्यादी ही मृतक अमोल तालन याची विधवा आहे. केवळ ती निकटवर्तीय नातेवाईक असल्यामुळे तिची साक्ष नाकारता येत नाही. तथापि, जेव्हा अभियोगपक्ष मुख्यत्वे तिच्यासमोर केलेल्या कथित तोंडी मृत्युपूर्व निवेदनावर दोषारोपासाठी अवलंबून राहतो, तेव्हा भोवतालच्या परिस्थितींची अधिक काळजीपूर्वक व काटेकोरपणे तपासणी करणे आवश्यक ठरते. संशय निर्माण करणारी पहिली व महत्त्वाची बाब म्हणजे मृतकक अमोल याची शारीरिक व मानसिक स्थिती अभियोगपक्षाला सिद्ध करण्यात अपयश आले आहे. अभियोगपक्षाच्या स्वतःच्या मांडणीप्रमाणे, मृतक अमोलच्या डोक्यावर, छातीवर व इतर महत्त्वाच्या अवयवांवर अनेक गंभीर जखमा झालेल्या होत्या. वैद्यकीय पुराव्याने हे स्पष्ट होते की, त्याला मोठ्या प्रमाणात अंतर्गत जखमा झाल्या होत्या, ज्यामुळे रक्तस्राव व शॉक निर्माण झाला आणि तो रुग्णालयात नेत असताना अल्पावधीत मृत्यू पावला. जखमांचे स्वरूप दर्शवते की, मृतक अमोल गंभीररीत्या जखमी होता व त्याची स्थिती अत्यंत गंभीर होती. तरीदेखील, अशा गंभीर जखमांनंतरही तो शुद्धीवर होता, मानसिकदृष्ट्या सक्षम होता व सुसंगत व विश्वासार्ह निवेदन करण्यास समर्थ होता, हे दाखविण्यासाठी अभियोगपक्षाने कोणतेही पुरावे सादर केलेले नाहीत.

३३. सदर प्रकरणात फिर्यादीने किंवा इतर कोणत्याही साक्षीदाराने असे ठामपणे सांगितलेले नाही की, मृतक अमोल घरात परत आला तेव्हा तो पूर्णपणे शुद्धीवर होता, सामान्यपणे बोलण्यास सक्षम होता, प्रश्नांना तर्कसंगत उत्तरे देत होता

किंवा घटनेचे सुसंगत वर्णन करीत होता. फिर्यादीने केवळ एवढेच म्हटले आहे की, त्याने तिला हल्ल्याबाबत माहिती दिली. अशा प्रकारचे विधान हे त्याच्या मानसिक स्थितीबाबतच्या पुराव्याची जागा घेऊ शकत नाही.

३४. कोणतेही मृत्युपूर्व निवेदन स्वीकारण्यापूर्वी न्यायालयाचे समाधान झाले पाहिजे की, निवेदन करणारा व्यक्ती प्रश्न समजण्यास व तर्कसंगत उत्तरे देण्यास सक्षम अशा योग्य मानसिक स्थितीत होता. असे समाधान केवळ गृहितकांवर किंवा अनुमानांवर आधारित असू शकत नाही. विशेषतः जेव्हा मृतकक गंभीर जखमांमुळे अल्पावधीत मृत्यू पावला, तेव्हा त्याची मानसिक स्थितीबाबत ठोस पुरावा नसताना न्यायालय सुरक्षितपणे असे गृहीत धरू शकत नाही की तो विश्वासार्ह मृत्युपूर्व निवेदन करण्यास सक्षम होता.

३५. सदर कथित तोंडी मृत्युपूर्व निवेदनाच्या विश्वासार्हतेवर परिणाम करणारी आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे अभियोगपक्षाच्या साक्षीदारांचे स्वतःचे वर्तन. मृतक अमोल घरात परतल्यावर त्याने इतर नातेवाईकांशी काही संवाद साधला होता, हे अभियोगपक्षाने सिद्ध केलेले नाही. निलेश (सा.क्र.३), सचिन (सा.क्र.५), दिवाकर (सा.क्र.६), गोकुळ (सा.क्र.७) व अंकुश (सा.क्र.८) यांसारख्या साक्षीदारांनी मृतक अमोलने त्यांना घटनेविषयीचे वर्णन केले किंवा आरोपीचे नाव सांगितले, असे सांगितलेले नाही. कोणत्याही साक्षीदाराने मृतक अमोलची मानसिक स्थिती, जागरूकता, सुसंगतता किंवा संवाद साधण्याची क्षमता; याबाबत काहीही सांगितलेले नाही. याठिकाणी, त्यांचे मौन हे अत्यंत महत्त्वाचे ठरते, कारण जर मृतक अमोल खरोखरच आरोपीचे नाव सांगण्याच्या स्थितीत असता, तर त्याने ते लगेचच उपस्थित असलेल्या निकटवर्तीय नातेवाईकांसमोर पुन्हा सांगितले असते, अशी नैसर्गिक अपेक्षा निर्माण होते. अशा प्रकारचे पुरावे नसल्यामुळे

अभियोगपक्षाची मांडणी संशयास्पद ठरते.

३६. सदर कथित तोंडी मृत्युपूर्व निवेदनाच्या विश्वासार्हतेवर परिणाम करणारी तितकीच महत्त्वाची बाब म्हणजे जय (सा.क्र.२) याच्या उपस्थितीबाबतची अभियोगपक्षाची चूक. अभियोगपक्षाच्या कथनानुसार जय (सा.क्र.२) याने आरोपीस घटनास्थळाजवळ पाहिले होते. तथापि, फिर्यादीने असे सांगितलेले नाही की, मृतक अमोलने आरोपीचे नाव सांगितले तेव्हा जय उपस्थित होता. जर जय (सा.क्र.२) प्रत्यक्षात उपस्थित असता, तर फिर्यादीने त्याची उपस्थिती नमूद करणे ही नैसर्गिक बाब ठरली असती, विशेषतः कारण अभियोगपक्षाच्या मते तो घटनेशी संबंधित महत्त्वाचा साक्षीदार होता. ही चूक महत्त्वाची ठरते, कारण ती दर्शवते की, अभियोगपक्षाचे संपूर्ण कथन सातत्यपूर्ण स्वरूपात उभे राहिलेले नाही.

३७. सदर कथित तोंडी मृत्युपूर्व निवेदनाच्या विश्वासार्हतेवर परिणाम करणारी आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे जय (सा.क्र.२) याचे वर्तन. अभियोगपक्षाच्या मांडणीनुसार, गंभीर डोक्याच्या जखमा झालेल्या व प्रचंड रक्तस्त्राव होत असलेल्या मृतककास तात्काळ रुग्णालयात नेण्याऐवजी जयला त्याचे चप्पल आणण्यासाठी पाठविण्यात आले. असे वर्तन सामान्य मानवी आचरणाशी सुसंगत वाटत नाही. ज्याला गंभीर डोक्याच्या जखमा झालेल्या आहेत व प्रचंड रक्तस्त्राव होत आहे, अशा व्यक्तीस तातडीने जवळच्या वैद्यकीय केंद्रात नेणे ही नैसर्गिक व अपेक्षित कृती ठरते. नातेवाईकांनी तातडीच्या वैद्यकीय उपचारांपेक्षा पादत्राणे आणण्यास अधिक महत्त्व दिले, हे स्वीकारणे कठीण आहे. ही परिस्थिती अभियोगपक्षाच्या कथनाच्या सत्यतेवर आणखी संशय निर्माण करते.

३८. सदर प्रकरणात अभियोगपक्षाने जय (सा.क्र.२) याच्या पुराव्यावर

अवलंबून राहण्याचा प्रयत्न केला आहे, ज्याने आरोपीस घटनास्थळाजवळ पाहिल्याचा दावा केला आहे. तथापि, ही साक्ष पूर्ण विश्वास निर्माण करणारी नाही. घटना रात्रीच्या वेळी घडली होती. योग्य ओळख पटविण्यासाठी पुरेसा प्रकाश उपलब्ध होता, हे सिद्ध करणारा समाधानकारक पुरावा अभियोगपक्षाने सादर केलेला नाही. जरी तपासादरम्यान अभियोगपक्षाने वीजपुरवठ्याबाबत माहिती विद्युत विभागाकडून मिळविल्याचे दिसते, तरी केवळ गावात वीजपुरवठा अस्तित्वात होता, यावरून घटनास्थळ प्रत्यक्षात प्रकाशमान होते, असे सिद्ध होत नाही. ही परिस्थिती अभियोगपक्षाच्या कथनाच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्न निर्माण करते.

३९. सदर प्रकरणात उलट पुरावे असे दर्शवतात की, ज्या ठिकाणी जय (सा.क्र.२) याने आरोपीस पाहिल्याचा दावा केला आहे, त्या गोठ्याजवळ कोणताही विद्युत खांब नव्हता. अभियोगपक्षाने त्या विशिष्ट ठिकाणी विद्युत प्रकाश उपलब्ध होता, हे सिद्ध केलेले नाही. तसेच, प्रकाशाची तीव्रता, साक्षीदार व आरोपी यांच्यातील अंतर, साक्षीदाराने आरोपीस किती वेळ पाहिले, किंवा त्या व्यक्तीचे चेहरेपट्टी स्पष्टपणे ओळखता येत होती का, याबाबत कोणताही पुरावा उपलब्ध नाही. फौजदारी खटल्यांमध्ये, विशेषतः रात्रीच्या वेळी ओळख पटविण्याच्या बाबतीत अशा तथ्यांना अत्यंत महत्त्व असते. पुरेशा प्रकाशाबाबत ठोस पुरावा नसताना, साक्षीदाराने आरोपीस शंका न उरता योग्यरीत्या ओळखले, असे सुरक्षितपणे मानणे न्यायालयास शक्य नाही.

४०. सदर प्रकरणात अभियोगपक्षाने घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.४०) यावर अवलंबून राहण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि, घटनास्थळ पंचनामा स्वतः अभियोगपक्षाच्या कथनास समाधानकारक पाठबळ देत नाही. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांनी आरोपीस "गोठा" जवळ पाहिल्याचे सांगितले आहे. परंतु आश्चर्यकारक

बाब म्हणजे घटनास्थळ पंचनाम्यात अशा गोठ्याचे स्थान स्पष्टपणे नमूद केलेले किंवा दर्शविलेले नाही. गोठा नेमका कुठे होता, हे दाखविणारा समाधानकारक पुरावा अभियोगपक्षाने सादर केलेला नाही. जर अभियोगपक्षालाच आरोपीस कथितरीत्या पाहिलेल्या ठिकाणाचे स्थान सिद्ध करण्यात अपयश आले असेल, तर साक्षीदाराने आरोपीस निश्चितपणे ओळखले, हे कसे मान्य करावे, हा प्रश्न निर्माण होतो. घटनास्थळ पंचनाम्यातील अशा महत्त्वाच्या बाबीचा अभाव अभियोगपक्षाच्या कथनाच्या पुराव्यात्मक मूल्याला कमकुवत करतो.

४१. सदर प्रकरणात आरोपीस दिलेले वर्तन तितकेच अशक्यप्राय वाटते. अभियोगपक्षाच्या मांडणीनुसार, खूनाचा हल्ला केल्यानंतर आरोपी घटनास्थळाजवळच थांबला होता आणि जय (सा.क्र.२) याने त्यास तेथे पाहिले. असे वर्तन सामान्य मानवी आचरणाशी विसंगत आहे. एखाद्या व्यक्तीने गंभीर व प्राणघातक हल्ला केला असल्यास, तो तात्काळ घटनास्थळावरून पळून जाण्याचा प्रयत्न करतो, जेणेकरून त्याची ओळख पटू नये. आरोपी घटनास्थळीच थांबला होता, याबाबत ठोस व विश्वासार्ह पुरावा नसल्यास असे वर्तन स्वाभाविक मानता येत नाही. परिस्थितिजन्य पुराव्याचे मूल्यांकन करताना न्यायालय अशा अशक्यप्राय बाबींकडे दुर्लक्ष करू शकत नाही.

४२. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे फिर्यादीच्या साक्षीतील विसंगती. फिर्यादीने तिच्या सरतपासणीमध्ये सुरुवातीला असे सांगितले की, जयने तिला आरोपीस पाण्याच्या टाकीजवळून पळताना पाहिल्याचे सांगितले. परंतु त्याच सरतपासणीमध्ये तिने नंतर असेही सांगितले की, जयने तिला आरोपीस गोठ्याजवळून पळताना पाहिल्याचे सांगितले. अशा प्रकारे, त्याच साक्षीत फिर्यादीने आरोपीस कथितरीत्या कुठून पळताना पाहिले, याबाबत दोन भिन्न आवृत्त्या दिल्या

आहेत. ही विसंगती अभियोगपक्षाच्या कथनाच्या सातत्यावर गंभीर प्रश्न निर्माण करते व त्याच्या विश्वासार्हतेस कमकुवत करते.

४३. सदर विसंगतीला किरकोळ तफावत म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. आरोपीस कथितरीत्या घटनेनंतर कुठे पाहिले गेले, हा अभियोगपक्षाने आधारलेला महत्त्वाचा दोषारोपात्मक घटक आहे. जर अभियोगपक्षालाच खात्री नाही की, आरोपीस पाण्याच्या टाकीजवळ पाहिले गेले की गोठ्याजवळ, तर त्या परिस्थितीची विश्वासार्हता संशयास्पद ठरते. अभियोगपक्षाने पाण्याची टाकी व गोठा हे एकाच ठिकाणी आहेत की वेगवेगळ्या ठिकाणी, किंवा त्यांच्यात किती अंतर आहे, हे स्पष्ट केलेले नाही. या परस्परविरोधी आवृत्त्यांना एकत्र आणण्याचा कोणताही प्रयत्न केलेला नाही. ही विसंगती अधिक महत्त्वाची ठरते कारण अभियोगपक्षाने घटनास्थळ पंचनाम्यात कथित गोठ्याचे नेमके स्थान समाधानकारकपणे सिद्ध केलेले नाही. घटनास्थळ पंचनाम्यात गोठा घटनास्थळाशी कोणत्या संबंधात होता, हे स्पष्टपणे दर्शविलेले नाही. परिणामी, आरोपीस गोठ्याजवळून पळताना पाहिल्याची नंतरची आवृत्ती कोणत्याही दस्तऐवजी पुराव्याने पुष्टी होत नाही. अशा पुष्टीअभावी, फिर्यादीच्या विसंगत विधानांमुळे अभियोगपक्षाचा खटला लक्षणीयरीत्या कमकुवत होतो.

४४. संपूर्णपणे परिस्थितिजन्य पुराव्यावर आधारित असलेल्या खटल्यात प्रत्येक परिस्थिती ठामपणे व सातत्याने सिद्ध झालेली असावी. अभियोगपक्षास अशा महत्त्वाच्या तथ्याबाबत दोन परस्परविरोधी आवृत्त्यांवर अवलंबून राहण्याची परवानगी देता येणार नाही. फिर्यादीच्या साक्षीत आरोपीस कथितरीत्या कुठून पळताना पाहिले गेले, याबाबत आढळणारी विसंगती ही दोषारोपात्मक परिस्थितीच्या सत्यतेवर व विश्वासार्हतेवर वाजवी शंका निर्माण करते. परिणामी, ही परिस्थिती अभियोगपक्षाने

आधारलेल्या परिस्थितींच्या साखळीत ठामपणे सिद्ध झालेली कडी म्हणून स्वीकारता येत नाही. उलट ती आणखी एक हरवलेली कडी ठरते, जी अभियोगपक्षाचा खटला कमकुवत करते व आरोपीस शंका लाभाचा अधिकार प्रदान करते.

४५. सदर कथित तोंडी मृत्युपूर्व निवेदनाच्या विश्वासार्हतेवर गंभीर शंका निर्माण करणारी आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे मृतक अमोलने घटनेपूर्वी मद्यसेवन केले होते, यासंबंधीचे पुरावे. अभियोगपक्षाचा साक्षीदार जय (सा.क्र.२) याने स्पष्टपणे कबूल केले आहे की, घटनेच्या दिवशी मृतक अमोलने मद्यसेवन केले होते. ही बाब वैद्यकीय व वैज्ञानिक पुराव्यानेही पुष्टी होते. वैद्यकीय अधिकारी डॉ. झोपाटे (सा.क्र.१२) यांनी त्यांच्या साक्षीत कबूल केले आहे की, रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.७६) मध्ये मृतक अमोलच्या अंतर्गत अवयव व रक्तामध्ये इथिल अल्कोहोल आढळले. याशिवाय, फिर्यादीने बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये मयत अमोलला मद्यसेवनाची सवय होती, हे मान्य केले आहे. म्हणूनच, जय याची साक्ष्य, वैद्यकीय अधिकाऱ्याची रासायनिक विश्लेषण अहवालाबाबतची कबुली, आणि फिर्यादीची कबुली या सर्व गोष्टी एकत्रितपणे स्पष्टपणे सिद्ध करतात की, मृतक अमोलने घटनेपूर्वी मद्यसेवन केले होते. केवळ मृतकने मद्यसेवन केले होते, या कारणावरून तो मृत्युपूर्व निवेदन करण्यास असमर्थ होता, असा कठोर नियम घालता येत नाही. जर अभियोगपक्षाने हे सिद्ध केले असते की, मृतकक शुद्धीवर होता, मानसिकदृष्ट्या सक्षम होता व स्वेच्छेने सत्यनिष्ठ निवेदन करण्याच्या स्थितीत होता, तर मद्यसेवनाचा तथ्य एकट्याने मृत्युपूर्व निवेदन नाकारण्यास पुरेसा ठरला नसता.

४६. तथापि, जेव्हा अभियोगपक्ष केवळ तोंडी मृत्युपूर्व निवेदनावर अवलंबून राहतो आणि भोवतालच्या परिस्थिती त्याच्या सत्यतेवर शंका निर्माण करतात, तेव्हा

मृतकने मद्यसेवन केले होते, ही बाब महत्त्वाची ठरते. सदर प्रकरणात अभियोगपक्षाने मृतककाच्या मद्यप्राशनाच्या प्रमाणाबाबत किंवा घटनेनंतर त्याच्या मानसिक जागरूकतेबाबत कोणताही पुरावा सादर केलेला नाही. कोणत्याही साक्षीदाराने असे सांगितलेले नाही की, मद्यसेवन व गंभीर जखमा असूनही मृतक अमोल पूर्णपणे शुद्धीवर होता, तर्कसंगत उत्तरे देत होता किंवा घटनेचे सुसंगत वर्णन करीत होता.

४७. फिर्यादीसह कोणत्याही साक्षीदाराने मृतक अमोल सामान्यपणे बोलत होता, प्रश्नांना तर्कसंगत उत्तरे देत होता किंवा घटनेचे सुसंगत वर्णन करीत होता, असे सांगितलेले नाही. वैद्यकीय पुराव्यातही असे काही आढळत नाही की, गंभीर जखमा व शरीरात इथाइल अल्कोहोल असतानाही मृतक अमोल मानसिकदृष्ट्या सक्षम होता. या त्रुटीचे महत्त्व कमी लेखता येणार नाही. नोंदविलेल्या पुराव्यांमधून तीन परिस्थिती एकाच वेळी स्पष्ट होतात: (अ) मृतकने मद्यसेवन केले होते, (ब) त्याला गंभीर जखमा झाल्या होत्या, ज्यात डोक्याच्या जखमांचा समावेश होता व तो अल्पावधीत मृत्यू पावला आणि (क) अभियोगपक्षाने त्याची शारीरिक व मानसिक स्थिती सिद्ध केलेली नाही. अशा परिस्थितीत न्यायालयास मृतकक योग्य मानसिक स्थितीत होता व विश्वासार्ह मृत्युपूर्व निवेदन करू शकला, असे गृहीत धरणे कायदेशीरदृष्ट्या संयुक्तिक ठरणार नाही. असे गृहीतक अभियोगपक्षाच्या खटल्यातील महत्त्वाची पोकळी अनुमानाने भरून काढण्यासारखे ठरेल, जे फौजदारी न्यायशास्त्रात ग्राह्य नाही.

४८. सदर प्रकरणात मयत अमोल तथाकथित मृत्युपूर्व निवेदन करण्यास सक्षम होता, हे ठामपणे व सकारात्मकरीत्या सिद्ध करण्याची जबाबदारी अभियोगपक्षावर होती. ती जबाबदारी पार पाडण्यात अभियोगपक्ष अपयशी ठरलेला

आहे. परिणामी, कथित तोंडी मृत्युपूर्व निवेदन हे संपूर्णपणे विश्वासार्ह पुरावा म्हणून ग्राह्य धरता येणार नाही. नोंदविलेल्या पुराव्यांचा एकत्रित परिणाम असा दिसून येतो की, मृतक अमोलने मद्यसेवन केले होते, रासायनिक विश्लेषण अहवालात इथाइल अल्कोहोल आढळले, त्याला गंभीर व प्राणघातक जखमा झाल्या होत्या, त्याच्या मानसिक स्थितीबाबत कोणताही पुरावा नाही, तत्संबंधी स्वतंत्र पुष्टीकरणाचा अभाव आहे. या सर्व परिस्थिती एकत्रितपणे तथाकथित तोंडी मृत्युपूर्व निवेदनाच्या सत्यतेवर व विश्वासार्हतेवर गंभीर व वाजवी शंका निर्माण करतात. परिणामी, अशा संशयास्पद पुराव्यावरच किंवा मुख्यत्वे त्यावर आधारित राहून आरोपीस दोषी ठरविणे न्यायोचित नाही.

४९. संदर्भिय, **जगबीर सींग (पुर्वोक्त),** या न्यायनिर्णयामध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले आहे की, जर मृत्युपूर्व निवेदन सत्यनिष्ठ, स्वेच्छेने दिलेले, कोणत्याही शिकवणीशिवाय किंवा काल्पनिकतेपासून मुक्त असेल आणि निवेदन करणारी व्यक्ती शारीरिक तथा मानसिकदृष्टया सक्षम स्थितीत असेल, तर असे निवेदन स्वतंत्र पुष्टीकरणाशिवायही दोषारोपासाठी पुरेसे ठरू शकते. न्यायालयाने अधोरेखित केले आहे की, मृत्युपूर्व निवेदन हे एक स्वतंत्र पुरावा आहे. जर न्यायालयास त्याच्या सत्यतेबाबत व विश्वासार्हतेबाबत पूर्ण समाधान झाले, तर केवळ अशा निवेदनावर आधारित दोषारोप कायदेशीरदृष्ट्या शक्य आहे. तथापि, सर्वोच्च न्यायालयाने हेही स्पष्ट केले आहे की, मृत्युपूर्व निवेदनावर विश्वास ठेवण्यापूर्वी न्यायालयास हे समाधान झाले पाहिजे की, निवेदन करणारी व्यक्ती योग्य मानसिक स्थितीत होती आणि निवेदन पूर्ण विश्वास निर्माण करणारे आहे. जर भोवतालच्या परिस्थिती त्याच्या सत्यतेवर किंवा स्वेच्छेवर शंका निर्माण करतात, तर न्यायालयाने अत्यंत सावधगिरीने त्याचे मूल्यांकन करावे. सदर कायदेशीर तत्त्वाबाबत कोणताही

वाद नाही. तथापि, या प्रकरणात कथित तोंडी मृत्युपूर्वीचे निवेदन विश्वासार्ह पुरावा म्हणून स्वीकारण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत अटी अभियोगपक्षाने समाधानकारकपणे सिद्ध केलेल्या नाहीत.

५०. मुख्यत्वेकरुन; लेखी निवेदनाचा अभाव–कथित मृत्युपूर्वीचे निवेदन हे दंडाधिकारी किंवा वैद्यकीय अधिकाऱ्याने नोंदविलेले लेखी निवेदन नसून, मृतककाच्या पत्नीसमोर केलेले तोंडी निवेदन आहे. पत्नी ही स्वार्थसंबंधित साक्षीदार असल्याने अशा तोंडी निवेदनास अधिक काटेकोरपणे तपासणे आवश्यक ठरते. त्याचप्रमाणे, मानसिक व शारीरिक स्थिती सिद्ध न होणे–मृतककाला गंभीर जखमा झालेला होता, त्यात डोक्याच्या जखमांचा समावेश होता, आणि अल्पावधीत मृत्यू पावला. जय (सा.क्र.२) यांनी मृतककाने मद्यसेवन केले होते, हे कबूल केले आहे. डॉ. झोपाटे यांनीही रासायनिक विश्लेषण अहवालात इथाइल अल्कोहोल आढळल्याचे मान्य केले आहे. फिर्यादीनेही मृतककाला मद्यसेवनाची सवय होती, हे कबूल केले आहे. तरीही कोणत्याही साक्षीदाराने मृतकक शुद्धीवर होता, प्रश्न समजून घेत होता, तर्कसंगत उत्तरे देत होता, असे सांगितलेले नाही. तसेच भोवतालच्या परिस्थितींचा आधार नसणे–फिर्यादीने तिच्या पुराव्यात जय (सा.क्र.२) याने आरोपीस कुठून पळताना पाहिले, याबाबत विसंगत विधान केले आहे, कधी पाण्याच्या टाकीजवळ, तर कधी गोठ्याजवळ. इतर साक्षीदारांनी मृतककाशी संवाद झाला किंवा तो मानसिकदृष्ट्या सक्षम होता, असे सांगितलेले नाही. घटनास्थळ पंचनाम्यात गोठ्याचे स्थान स्पष्ट केलेले नाही, जेथे आरोपीला पाहिले तेथे प्रकाशाचा स्रोत सिद्ध केलेला नाही, आणि साक्षीदारांचे वर्तनही अस्वाभाविक आहे.

५१. या सर्व त्रुटी अभियोगपक्षाच्या स्वतःच्या पुराव्यांतूनच उघड होतात. त्यामुळे, जरी विश्वासार्ह मृत्युपूर्वीचे निवेदन स्वतंत्र पुष्टीकरणाशिवाय दोषारोपासाठी

पुरेसे ठरते, तरी ते तत्त्व केवळ तेव्हा लागू होईल जेव्हा मृत्युपूर्वीचे निवेदन पूर्णपणे विश्वासार्ह व मानसिकदृष्ट्या सक्षम व्यक्तीकडून दिलेले असते. सदर प्रकरणात अभियोगपक्षाला या मूलभूत अटी सिद्ध करण्यात अपयश आले आहे. परिणामी, तथाकथित तोंडी मृत्युपूर्वीचे निवेदन दोषारोपासाठी एकमेव आधार म्हणून ग्राह्य धरता येणार नाही. सबब, निर्माण झालेल्या शंकेचा लाभ आरोपीस मिळणे आवश्यक आहे. परिणामी, नमूद केलेल्या माननीय सर्वोच्च न्यायालयाने नोंदविलेल्या प्रमेयाची विशेष मदत प्रस्तुतचे प्रकरणी होणार नाही.

५२. फिर्यादी आणि साक्षीदार यांच्या पुराव्याचे बारकाईने निरीक्षण केले असता असे दिसुन येते की, ते दोन्ही साक्षीदार हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. या दोन्ही साक्षीदारांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये मयत अमोल तालन याला दारु पिण्याचे व्यसन होते, हे मान्य केलेले आहे. फिर्यादीने तिच्या अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या सरतपासणीमध्ये आरोपीने त्याचे मुलीसोबत असलेल्या अनैतिक संबंधाचे कारणावरुन मयत अमोल तालन याला काठीने मारहाण करुन त्याचा खून केल्याचे सांगितले आहे. याउलट साक्षीदार जय तालन (सा.क्र.२) याने त्याला त्याचे नातेवाईकाकडुन समजले की, त्याचा काका अमोल याचे आरोपीची विवाहीत मुलगी सुषमा हिच्यासोबत अनैतिक संबंध होते, असे सांगितलेले आहे. या मुद्दयाबाबत साक्षीदार जय तालन (सा.क्र.२) याचा साक्षीपुरावा हा ऐकीव स्वरुपाचा असल्याने त्याला जास्त महत्व देता येणार नाही. तसेच फिर्यादीने तिच्या अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या सरतपासणीतील पुराव्यात सांगितले की, सुषमा हिने हातावर चिरे मारले, आता मी मरत आहे, आणि तिच्या पतीला हार, जोडवे आणि सिंदूर आणण्यास सांगितले होते, तिने तिच्या पतीच्या मोबाईलमध्ये वॉटसअपवर हातावर चिरे मारल्याचे फोटो पाहीले होते आणि त्यामुळे तिला तिचा पती आणि सुषमा यांचे

प्रेमसंबंध आहे याची खात्री झाली होती. परंतु फिर्यादीने बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये फिर्यादीने स्पष्ट शब्दात मान्य केले की, तिने तिच्या पतीच्या मोबाईलमध्ये चिरे मारल्याचे छायाचित्र पाहीले, त्यामध्ये कोणाचाही चेहरा दिसत नव्हता.

५३. फिर्यादीने तिच्या साक्षीपुराव्यात तिने जय तालनला तिच्या पतीची चप्पल आणण्यासाठी पाण्याच्या टाकीजवळ पाठविल्याचे सांगितले असुन त्यानंतर जय तालन थोडया वेळात चप्पल घेवुन परत आला आणि त्याने आरोपीला गावंडे यांच्या जनावराच्या गोठयातून काठीसह पळुन जातांना पाहील्याचे सांगितलेले आहे. साक्षीदार जय तालन (सा.क्र.२) याने देखील या बाबीला दुजोरा दिलेला आहे. तसेच साक्षीदार जय तालन (सा.क्र.२) याने त्याच्या सरतपासणीमध्ये, त्यावेळी आरोपीने फिक्कट निळया रंगाचा शर्ट (एम.ओ.क्र.–८) हिरवट काळपट रंगाची पॅन्ट (एम.ओ.क्र.–९) घातलेली होती, असे देखील सांगितले होते. मात्र, उलटतपासणीमध्ये पोलीसांनी त्याला कपडे आणि काठी ओळखण्यासाठी पोलीस स्टेशनला बोलविले नव्हते, हे मान्य केलेले आहे. तपासी अधिकारी यांनी त्यांच्या उलटतपासणीमध्ये, जय तालन याने त्याचे बयान नोंदविताना असे सांगितले नव्हते की, त्याला (एम.ओ.क्र.–८ व ९) दाखविण्यात आले होते. या विसगंतीमुळेच साक्षीदार जय तालन (सा.क्र.२) याने आरोपीला पळून जातांना पाहील्याबाबतच साशंकता निर्माण होते. तसेच आरोपीच्या सदर कपडयांच्या वर्णनाची बाब त्याच्या बयानात नमूद करण्यात आलेली नाही. यावरुन सदरची कपडयांसंबंधीची पुराव्यातील उणीव अभियोगपक्षाने सिध्द केलेली नाही. सदरची विसगंती ही महत्वाची असुन अभियोगपक्षाच्या प्रकरणाला मारक ठरणारी अशीच आहे.

५४. अभियोगपक्षातर्फे या प्रकरणी, साक्षीदार निलेश सदाशिवराव तालन

(सा.क्र.३) (नि.क्र.३८) वर तपासण्यात आलेले आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात सांगितले की, तो दिनांक ०९.०१.२०२२ रोजी, रात्री ८.०० वाजताच्या दरम्यान, गोकुळ तालन याच्या घरासमोर अंकुश भडके याच्यासोबत उभा होता. त्यावेळी, दिवाकर तालन त्यांच्याकडे आला आणि अमोल तालन याला दवाखान्यात घेवुन जायचे आहे असे सांगितले. त्यामुळे ते अमोलच्या घरी गेले असता, तो भिंतीला टेकुन बसला होता आणि त्याच्या डोक्यातुन रक्त निघत होते. त्यानंतर त्यांनी उपचारासाठी अमोलला सेवाग्राम रुग्णालयात नेले; परंतु वैद्यकीय अधिकारी यांनी तो मरण पावल्याचे सांगितले. त्याने त्याच्या साक्षीपुराव्यात पुढे सांगितले की, फिर्यादी अर्चना हिने त्याला सांगितले की, आरोपीची मुलगी आणि अमोलचे प्रेमसंबंध होते, या कारणामुळे आरोपीने त्याला काठीने डोक्यात मारुन ठार केले.

५५. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये सदर साक्षीदाराने मान्य केले की, त्याचे आणि मयत अमोलचे चांगले संबंध होते, त्याला अमोलच्या प्रेमप्रकरणाबाबत वैयक्तिक माहिती नाही आणि अमोलच्या पत्नीने दिलेल्या प्रेमसंबंधाच्या माहिती आधारे त्याने पोलीसांना जबाब दिला आहे. सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे बारकाईने निरीक्षण केले असता असे दिसुन येते की, तो घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसुन तो घटनेनंतर मयताच्या घरी गेल्याचे आणि त्यानंतर झालेल्या माहितीच्या आधारे त्याने साक्षीपुरावा दिलेला आहे. सदर साक्षीदाराने त्याचे मयत अमोलसोबत चांगले संबंध असल्याचे मान्य केले आहे आणि तो मयत आणि फिर्यादीचा यांचा नातेवाईक असुन हितदर्शी साक्षीदार असल्याचे दिसुन येते.

५६. अभियोगपक्षाने साक्षीदार सचिन बाळकृष्ण तालन (सा.क्र.५) (नि.क्र.४७) वर तपासले आहे. त्याने त्याच्या साक्षीत सांगितले की, मयत अमोल तालन त्याचा धाकटा भाऊ होता. दिनांक ०९.०१.२०२२ रोजी, रात्री ८.३०

वाजताच्या दरम्यान, तो पुलगाव येथे असताना त्याचा भाऊ दिवाकर याने फोन करुन सांगितले की, अमोल तालन याला आरोपीने मारल्याने त्याच्या डोक्यातुन रक्त निघत आहे आणि तो त्याला घेवुन दवाखान्यात जात आहे. त्याने पुढे सांगितले की, रात्री १.१५ वाजता त्याला पुन्हा त्याचा भाऊ दिवाकरचा फोन आला व त्याने सांगितले की अमोल उपचारादरम्यान मरण पावला आहे. त्याने पुढे सांगितले की, फिर्यादी अर्चना हिने त्याला सांगितले की, आरोपीची मुलगी आणि अमोलचे प्रेमसंबंध होते आणि सदर प्रेमसंबंधाची माहिती आरोपीस झाली, त्यामुळे आरोपीने अमोलला डोक्यावर, छातीवर व तोंडावर मारुन गंभीर जखमी केले व त्याचा खून केला.

५७. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये सदर साक्षीदाराने मान्य केले की, त्याला मयत अमोल आणि सुषमा यांच्या प्रेमसंबंधाबाबत वैयक्तिक माहिती नाही, त्याच्या प्रेमसंबंधाची माहिती त्याला फिर्यादीकडुन मिळाली होती आणि फिर्यादीने दिलेल्या माहितीच्या आधारे त्याने पोलीसांना बयान दिले होते. सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे बारकाईने निरीक्षण केले असता असे दिसुन येते की, तो घटनेच्या वेळी घटनास्थळी उपस्थित नसुन त्याचा पुरावा हा ऐकीव स्वरुपाचा आहे, त्यामुळे तो अभियोगपक्षाच्या उपयुक्ततेचा नाही.

५८. अभियोगपक्षाने साक्षीदार दिवाकर बाळकृष्ण तालन (सा.क्र.६) (नि.क्र.४९) वर तपासले आहे. त्याने त्याच्या साक्षीत सांगितले की, मयत अमोल तालन त्याचा लहान भाऊ होता. दिनांक ०९.०१.२०२२ रोजी, रात्री ८.३० वाजताच्या दरम्यान, अमोलची मुलगी राणी त्याच्या घरी आली व म्हणाली की, बाबा घरी चला तिच्या वडीलांना मार लागलेला आहे, त्यामुळे तो अमोलच्या घरी गेला. अमोलच्या डोक्याला लागले होते व खूप रक्त निघत होते. त्याने पुढे सांगितले की, फिर्यादी अर्चना हिने त्याला सांगितले की, अमोल जखमी अवस्थेत घरी आला आणि

त्याने सांगितले की, आरोपीने त्याची सुषमा हिचेसोबत प्रेमसंबंधाच्या कारणावरुन भांडण करुन त्याला काठीने मारले. त्याने पुढे सांगितले की, अमोलचा अंत्यविधी झाल्यानंतर, फिर्यादी अर्चना हिने त्याला सांगितले की, आरोपीची मुलगी आणि अमोलचे प्रेमसंबंध होते आणि सदर प्रेमसंबंधाची माहिती आरोपीला झाली, त्यामुळे आरोपीने अमोलला डोक्यावर, छातीवर व तोंडावर मारुन गंभीर जखमी केले आणि उपचार चालु असताना अमोल मरण पावला.

५९. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये सदर साक्षीदाराने मान्य केले की, घटनेपुर्वी त्याला फिर्यादीने अमोलच्या प्रेमसंबंधाबाबत सांगितले नव्हते आणि त्याला अमोलच्या प्रेमसंबंधाबाबत वैयक्तिक माहिती नाही. त्याने हेदखील मान्य केले की, तो अमोलच्या घरी गेला, तेव्हा जय तालन त्याठिकाणी नव्हता आणि जय तालन आला तेव्हा ते अमोलला रुग्णालयात घेवून जाण्याच्या गडबडीत होते. सदर साक्षीदाराच्या पुराव्यावरुन तो घटनेच्या वेळी घटनास्थळीच उपस्थित नव्हता आणि तो घटनेनंतर मयताच्या घरी गेला होता. सदर साक्षीदाराने मयत अमोल हा त्याचा लहान भाऊ असल्याचे सांगितले असुन तो हितदर्शी साक्षीदार असल्याचे दिसुन येते. तसेच अनैतिक संबंध या महत्वाच्या मुद्दयाबाबत सदर साक्षीदाराचा पुरावा हा ऐकीव स्वरुपाचा आहे, त्यामुळे सदर साक्षीदाराचा पुरावा अभियोगपक्षास समर्पक नाही.

६०. अभियोगपक्षाने साक्षीदार गोकुळ देवरावजी तालन (सा.क्र.७) (नि.क्र.५२) वर तपासले आहे. त्याने त्याच्या साक्षीत सांगितले की, मयत अमोल तालन त्याचा चुलत भाऊ होता. दिनांक ०९.०१.२०२२ रोजी, रात्री ८.३० वाजताच्या दरम्यान, तो घरी होता. त्यावेळी त्याचा चुलत भाऊ दिवाकर तालन आला व त्याने सांगितले की, अमोल तालन याला डोक्याला लागले आहे आणि

त्याला रुग्णालयात घेवुन जायचे आहे. त्यामुळे तो अमोलच्या घरी गेला, तेथे त्याने पाहीले की, अमोल जखमी होता, तो भिंतीला टेकुन बसला होता आणि त्याचे डोक्यातुन खूप रक्त निघत होते. त्याने पुढे सांगितले की, फिर्यादी अर्चना हिने त्याला सांगितले की, आरोपीची मुलगी आणि अमोलचे प्रेमसंबंध होते आणि सदर प्रेमसंबंधाची माहिती आरोपीला झाली, त्यामुळे आरोपीने अमोलला डोक्यावर, छातीवर व तोंडावर मारुन गंभीर जखमी केले आणि उपचार चालु असताना अमोल मरण पावला.

६१. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये सदर साक्षीदाराने मान्य केले की, त्याने न्यायालयात व पोलीसांना दिलेले बयान हे ऐकीव माहितीच्या आधारे दिले होते. त्याने सांगितले की, या घटनेअगोदर अमोलचे कोणासोबत प्रेमसंबंध होते, याबाबत त्याला माहिती नाही. सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे बारकाईने निरीक्षण केले असता असे दिसुन येते की, तो घटनेच्या वेळी घटनास्थळी उपस्थित नव्हता आणि तो घटनेनंतर मयताच्या घरी गेला होता. सदर साक्षीदाराने मयत अमोल हा त्याचा भाऊ असल्याचे सांगितले असुन तो हितदर्शी साक्षीदार असल्याचे दिसुन येते. सदर साक्षीदाराने या घटनेअगोदर अमोलचे कोणासोबत प्रेमसंबंध होते याबाबत त्याला माहिती नसल्याचे स्पष्ट शब्दात सांगितलेले आहे. इतकेच नव्हे तर सदर साक्षीदाराने त्याचे न्यायालयात व पोलीसांना ऐकीव माहितीच्या आधारे बयान दिले; यावरुन सदर साक्षीदाराचा पुरावा विश्वासार्ह नाही.

६२. अभियोगपक्षाने साक्षीदार अंकुश संजय भडके (सा.क्र.८) (नि.क्र.५३) वर तपासले आहे. त्याने त्याच्या साक्षीत सांगितले की, मयत अमोल तालन त्याच्या गावातील रहिवासी होता. दिनांक ०९.०१.२०२२ रोजी, रात्री ८.३० वाजताच्या दरम्यान, तो घरी होता. त्यावेळी त्याचा शेजारी दिवाकर तालन आला व त्याने

सांगितले की, अमोल तालन याला डोक्याला लागले आहे आणि त्याला रुग्णालयात घेवुन जायचे आहे. त्यामुळे तो अमोलच्या घरी गेला, तेथे त्याने पाहीले की, अमोल जखमी होता, तो भिंतीला टेकुन बसला होता आणि त्याचे डोक्यातुन खूप रक्त निघत होते. त्याने पुढे सांगितले की, फिर्यादी अर्चना हिने त्याला सांगितले की, आरोपीची मुलगी आणि अमोलचे प्रेमसंबंध होते आणि सदर प्रेमसंबंधाची माहिती आरोपीला झाली, त्यामुळे आरोपीने अमोलला डोक्यावर, छातीवर व तोंडावर मारुन गंभीर जखमी केले आणि उपचार चालु असताना अमोल मरण पावला.

६३. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये सदर साक्षीदाराने मान्य केले की, त्याने न्यायालयात व पोलीसांना दिलेले बयान हे ऐकीव माहितीच्या आधारे दिले होते. त्याने सांगितले की, या घटनेअगोदर अमोलचे कोणासोबत प्रेमसंबंध होते, याबाबत त्याला माहिती नाही. सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे बारकाईने निरीक्षण केले असता असे दिसुन येते की, तो घटनेच्या वेळी घटनास्थळीच उपस्थित नव्हता आणि तो घटनेनंतर मयताच्या घरी गेला होता. सदर साक्षीदाराने या घटनेअगोदर अमोलचे कोणासोबत प्रेमसंबंध होते, याबाबत त्याला माहिती नसल्याचे स्पष्ट शब्दात सांगितलेले आहे. इतकेच नव्हे तर सदर साक्षीदाराने त्याचे न्यायालयात व पोलीसांना ऐकीव माहितीच्या आधारे बयान दिले असे मान्य केलेले आहे, त्यामुळे त्याच्या पुराव्यावर विश्वास ठेवता येणार नाही.

६४. अभियोगपक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या या साक्षीदारांच्या पुराव्याचे बारकाईने निरीक्षण केले असता असे दिसुन येते की, साक्षीदार जय तालन (सा.क्र.२), निलेश तालन (सा.क्र.३), सचिन तालन (सा.क्र.५), दिवाकर तालन (सा.क्र.६) व गोकुळ तालन (सा.क्र.७) हे एकाच कुटूंबातील सदस्य असुन ते फिर्यादी आणि मयताच्या कुटूंबाचे जवळचे नातेवाईक असल्याचे दिसुन येते, त्यामुळे

ते हितदर्शी साक्षीदार ठरतात. या सर्व साक्षीदारांनी त्यांच्या पुराव्यात फिर्यादीला मदत करण्याच्या अनुषंगाने अनैतिक संबंधाबाबत साक्षीपुरावा दिलेला आहे. अशा परिस्थितीत, जर साक्षीदार केवळ फिर्यादीच्या कथनावर आधारित साक्ष देत असतील तर त्यांची साक्ष विश्वासार्ह मानली जात नाही. तसेच अन्य स्वतंत्र व साक्षीदार अंकुश भडके (सा.क्र.८) याचा साक्षीपुरावा हा ऐकीव स्वरुपाचा असल्याने तो अभियोगपक्षाच्या कथनास पुष्टी देणारा ठरत नाही.

६५. अभियोगपक्षाने सुषमा सचिन कडू (सा.क्र.११) हिला मयत व आरोपी यांच्यातील कथित वादास कारणीभूत ठरलेला हेतू सिद्ध करण्याच्या उद्देशाने तपासले आहे. अभियोग पक्षाचा दावा असा आहे की, मयत अमोल तालन व सुषमा यांच्यामध्ये अनैतिक संबंध होते आणि त्याच कारणावरून आरोपीने मयताचा खून केला. त्यामुळे सुषमा (सा.क्र.११) ची साक्ष ही अभियोग पक्षाच्या हेतू सिद्ध करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरते.

६६. सुषमा (सा.क्र.११) हिने तिच्या सरतपासणीमध्ये मयत अमोल तालन हा तिला परिचित असल्याचे सांगितले. तिने त्याच्याशी मोबाईल फोनवर बोलणे व व्हॉटसॲपवर चॅटिंग करीत असल्याचेही मान्य केले आहे. तसेच ही बाब तिच्या पतीच्या निदर्शनास आल्यावर त्याने तिच्याकडे विचारणा केल्याचे, तिने त्याच्यासमोर चूक झाल्याचे मान्य केल्याचे आणि यापुढे अमोलशी संपर्क ठेवणार नसल्याचे सांगितल्याचेही नमूद केले आहे. मात्र, त्यानंतरही ती अमोलशी बोलत राहिल्याचे तिने कबूल केले आहे. तिने पुढे असेही सांगितले की, तिच्या पतीने मोबाईल काढून घेतल्यामुळे रागाच्या भरात तिने स्वतःच्या हातावर ब्लेडने चिरे मारून घेतले होते. निःसंशयपणे, या साक्षीवरून सुषमा (सा.क्र.११) व मयत अमोल यांच्यामध्ये दूरध्वनीवर संपर्क व व्हॉटसॲपद्वारे संवाद होत असल्याचे दिसून येते. तथापि, केवळ

वारंवार दूरध्वनीवर बोलणे किंवा संदेशांची देवाणघेवाण होत होती, या एकाच कारणावरून त्यांच्यामध्ये विवाहबाह्य अथवा अनैतिक संबंध होते, असा निष्कर्ष काढणे न्यायसंगत ठरणार नाही. एखाद्या व्यक्तीशी नियमित संपर्क असल्यानेच त्यांच्यामध्ये अनैतिक संबंध असल्याचा निष्कर्ष काढण्यासाठी ठोस व विश्वासार्ह पुरावा आवश्यक असतो.

६७. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये सुषमा (सा.क्र.११) हिने स्पष्टपणे सांगितले आहे की, ती अमोल तालन याच्याशी फोनवर व व्हॉटसॲपवर सर्वसाधारण स्वरूपाचे बोलणे करीत होती आणि ती त्याच्याशी कोणत्याही चुकीच्या अथवा अनैतिक पद्धतीने बोलत नव्हती. तिच्याकडून या संदर्भात कोणतीही कबुली मिळालेली नाही. तिच्या साक्षीतून मयताशी विवाहबाह्य किंवा अनैतिक संबंध असल्याचे कोणतेही स्पष्ट विधान समोर आलेले नाही. त्यामुळे तिच्या सरतपासणीमधील कबुलीजबाबावरून अभियोग पक्षाने अपेक्षित केलेला हेतू सिद्ध होत नाही.

६८. हेदेखील लक्षात घेण्यासारखे आहे की, अभियोग पक्षाने सुषमा (सा.क्र.११) हिच्या मोबाईल फोनमधील कथित व्हॉटसॲप संदेश, कॉल रेकॉर्ड्स किंवा अन्य कोणताही इलेक्ट्रॉनिक पुरावा न्यायालयासमोर सादर केलेला नाही. त्यामुळे केवळ ती अमोलशी बोलत होती, या मौखिक पुराव्याच्या आधारे त्यांच्या संबंधांचे स्वरूप अनैतिक होते, असा निष्कर्ष काढणे सुरक्षित ठरणार नाही.

६९. बचावपक्षाने सचिन मारोतराव कडू (ब.सा.क्र.१) यांना (नि.क्र.१०७) वर तपासलेले आहे. तो सुषमा (सा.क्र.११) चा पती असून, त्याने मयत अमोल हा त्याचा शेजारी असल्यामुळे त्याला ओळखत असल्याचे सांगितले आहे. त्याने एवढेच

मान्य केले की, त्याची पत्नी सुषमा व अमोल यांच्यामध्ये बोलचाल होती. परंतु, त्याने स्पष्टपणे सांगितले की, त्याच्या पत्नीचे मयताशी कोणतेही विवाहबाह्य अथवा अनैतिक संबंध नव्हते. उलट, त्याने सुषमा हिच्याकडे स्वतंत्र वैयक्तिक मोबाईल फोनही नसल्याचे सांगितले आहे. अभियोगपक्षाने उलटतपासणीमध्ये त्याला अशी सूचना दिली की, त्याने आरोपीला सुषमा व अमोल यांच्या कथित विवाहबाह्य संबंधाबाबत माहिती दिली होती आणि त्याच कारणावरून आरोपीने अमोलचा खून केला. मात्र, त्याने ही सूचना स्पष्ट शब्दात नाकारली आहे. अभियोग पक्षाला त्याच्या या नकाराचे खंडन करणारा कोणताही स्वतंत्र किंवा विश्वासार्ह पुरावा सादर करता आलेला नाही.

७०. फौजदारी खटल्यात बचाव पक्षाचा पुरावा हा अभियोग पक्षाप्रमाणे संशयाच्या पलीकडे सिद्ध करणे आवश्यक नसते. बचाव पक्षाने केवळ अभियोग पक्षाच्या कथनाबाबत वाजवी शंका निर्माण केली, तरी ते पुरेसे असते. सचिन (ब.सा.क्र.१) याच्या पुराव्यातून अभियोग पक्षाने मांडलेला हेतू गंभीरपणे डळमळीत होतो. कारण ज्याच्या पत्नीबाबत कथित अनैतिक संबंध असल्याचा दावा करण्यात आला आहे, त्या पतीनेच अशा संबंधांचे स्पष्टपणे खंडन केले असून, त्याचा पुरावा खोटा असल्याचे दाखविण्यात अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे.

७१. आणखी एक महत्त्वाची बाब लक्षात घेण्यासारखी आहे. अभियोग पक्षाच्या कथनानुसार, मयत अमोल तालन व सुषमा (सा.क्र.११) यांच्यामधील कथित अनैतिक संबंधांमुळे आरोपीला राग येऊन त्याने गुन्हा केला. तथापि, काही काळासाठी असे संबंध अस्तित्वात होते, असे गृहीत धरले तरी, अशा परिस्थितीत सर्वप्रथम संताप होणे स्वाभाविकपणे सुषमाचा पती सचिन (ब.सा.क्र.१) यालाच अपेक्षित होते. कारण कथित संबंधांमुळे त्यांच्याच वैवाहिक जीवनावर प्रतिकूल

परिणाम होण्याची शक्यता होती. मात्र, अभियोग पक्षाने आरोपीलाच असा तीव्र संताप निर्माण होऊन त्याने मयताची हत्या केली, हे कोणत्याही ठोस व विश्वासार्ह पुराव्याने सिद्ध केलेले नाही. त्यामुळे केवळ कथित हेतुच्या आधारावर आरोपीला गुन्ह्याशी जोडणे सुरक्षित ठरणार नाही.

७२. सचिन (ब.सा.क्र.१) आणि सुषमा (सा.क्र.११) या दोन्ही साक्षीदारांच्या साक्षीचे एकत्रितपणे मूल्यांकन केल्यास एवढेच सिद्ध होते की, सुषमा (सा.क्र.११) व मयत अमोल यांच्यामध्ये काही प्रमाणात दूरध्वनीवर बोलणे होत असे. मात्र त्या संपर्काचे स्वरूप अनैतिक किंवा विवाहबाह्य होते, असे निश्चितपणे सिद्ध होत नाही. त्यामुळे अभियोग पक्षाने मांडलेला आरोपीकडे गुन्हा करण्याचा हेतू हा ठोस, विश्वासार्ह व संशयरहित पुराव्याने सिद्ध झाल्याचे म्हणता येणार नाही. जेव्हा अभियोगपक्षाचा संपूर्ण खटला परिस्थितीजन्य पुराव्यावर आधारित आहे, तेव्हा हेतू हा त्या साखळीतील एक महत्त्वाचा दुवा असतो. प्रस्तुत प्रकरणात तो दुवा संशयाच्या पलीकडे सिद्ध करण्यात अभियोगपक्ष अपयशी ठरलेले आहे. परिणामी, हेतूवर आधारित अभियोगपक्षाची भूमिका कमकुवत होते आणि त्याचा लाभ आरोपीस मिळणे अपरिहार्य ठरते.

७३. अभिलेखावरील आरोपीचे निवेदन व लाकडी उभारीचा जप्ती पंचनामा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने पंच साक्षीदार कृष्णा चंद्रभान आताग्रे (सा.क्र.९) (नि.क्र.६०) वर तपासले आहे. त्यांनी त्यांच्या न्यायालयासमोरील साक्षीत सांगितले की, दिनांक १२.०१.२०२२ रोजी, ते महावितरण कंपनीमध्ये प्रधान तंत्रज्ञ या पदावर कार्यरत होते आणि ते कर्तव्यावर उपस्थित होते. त्यांच्या कार्यालयास पुलगाव पोलीसांकडून पंच मिळविण्याबाबत पत्र (नि.क्र.६१) प्राप्त झाले. त्या पत्राच्या अनुषंगाने त्याची व अन्य पंच गणराज कडवे यांची नेमणूक करण्यात

आली होती. त्यानुसार, दिनांक १२.०१.२०२२ रोजी, ते अन्य पंचासोबत पोलीस स्टेशन, पुलगावला गेले, पोलीसांनी त्यांना सुचनापत्र (नि.क्र.६२) दिले. पोलीसांनी आरोपीला त्यांच्यासमक्ष बोलविले. त्यावेळी आरोपीने ''त्याने बैलबंडीची उभारीची लाकडी काठी वापरुन मयताला मारले होते. ती काठी मी काढून देतो' असे त्यांच्यासमक्ष निवेदन दिले. पोलीसांनी आरोपीचे निवेदन नोंदवून त्यांच्या उपस्थितीत निवेदन पंचनामा (नि.क्र.६३) तयार केला. त्यानंतर आरोपीने रस्ता दाखविल्याप्रमाणे, ते दोन्ही पंच, पोलीस कर्मचारी मौजा येसगांव येथे गेले. ते सर्वजण येसगांव येथील घरी गेले. आरोपीने त्याचे घरामध्ये असलेल्या दुस–या खोलीत सज्ञयावर ठेवलेली लाकडी उभारी काढून दिली. लाकडी उभारी जप्त करण्यापुर्वी श्री. तिरपुडे त्याठिकाणी आले व त्यांनी ती लाकडी उभारी त्यांच्या बैलबंडीची असल्याचे सांगितले होते. पोलीसांनी ती लाकडी उभारी पंचासमक्ष जप्ती पंचनाम्याद्वारे सीलबंद करुन जप्त केली. त्याबाबत, पोलीसांनी जप्ती पंचनामा (नि.क्र.६४) तयार केला. त्याने लाकडी उभारी आर्टीकल एम.ओ.–१ ओळखली.

७४. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये सदर साक्षीदाराने तो येसगांव येथे पोलीसासोबत गेल्यानंतर तेथे बरेच लोक जमा झाल्याचे स्पष्ट शब्दात मान्य केले आहे. बचावपक्षातर्फे देण्यात आलेल्या ईतर सुचना सदर साक्षीदाराने नाकारलेल्या आहेत.

७५. तपासी अधिकारी प्रमोद नागोराव पाटील (सा.क्र.१३) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पंच साक्षीदाराला निवेदन पंचनामा आणि लाकडी उभारीचा जप्ती पंचनामा दुजोरा देणारी साक्ष दिलेली आहे. तपासी अधिकारी प्रमोद नागोराव पाटील (सा.क्र.१३) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये आरोपी कबुलीलबाब देण्यास तयार असल्याने, त्यांनी पंचांना मिळवण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला पत्र

जारी केल्याचे सांगितले आहे. तपासी अधिकारी यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये सांगितले की, आरोपी कोठडीत होता, त्याला कोठडीतुन बाहेर काढण्यात आले, त्यावेळी आरोपीने ''लाकडी उभारी मी लपवुन ठेवली आहे, मला माहित आहे, सोबत चला, काढून देतो'' असा कबुलीजबाब दिला. त्यानुसार, त्यांनी आरोपीचा कबुलीजबाब दोन पंचांसमक्ष (सा.क्र.६३) नोंदविला. त्यांनी पुढे सांगितले की, त्यानंतर ते, आरोपी, दोन पंच आणि पोलीस कर्मचा-यासंह एका पोलीस वाहनातून पोलीस स्टेशनमधून निघाले. आरोपी त्यांना येसगांवला घेगुन गेला. आरोपीने त्यांना अहिल्याबाई समाज मंदिराच्या बाजूने रस्त्याकडे गाडी नेण्यास सांगितली. जिथे सिमेंटचा रस्ता संपतो तिथे गाडी थांबविण्यास सांगितली. त्यानंतर, आरोपी, पंच आणि पोलीस आरोपीच्या घरात गेले, आरोपीने लाकडी उभारी दुस-या खोलीच्या सज्ज्यावरुन काढुन दिली, ती त्यांनी पंचांसमक्ष जप्त केली आणि त्यानुसार माल काढून दिल्याचा पंचनामा नि.क्र.६४ तयार केला.

७६. आरोपीचे निवेदन व लाकडी उभारीचा जप्ती पंचनामा याबाबत पंच साक्षीदार कृष्णा चंद्रभान आताग्रे (सा.क्र.९) आणि तपासी अधिकारी प्रमोद नागोराव पाटील (सा.क्र.१३) यांनी दिलेल्या पुराव्याचे बारकाईने निरीक्षण केले असता असे दिसुन येते की, पंच साक्षीदाराने त्याच्या अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या सरतपासणीच्या साक्षीपुराव्यामध्ये लाकडी उभारी जप्त करण्यापुर्वी श्री. तिरपुडे त्याठिकाणी आले व त्यांनी ती लाकडी उभारी त्यांच्या बैलबंडीची असल्याचे सांगितले होते. याउलट तपासी अधिकारी यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये सदरच्या बाबीबाबत काहीही सांगितलेले नाही. आरोपीचा निवेदन पंचनामा (नि.क्र.६३) चे अवलोकन केले असता त्यामध्ये देखील सदर बाबीचा उल्लेख केलेला नाही. तसेच राजेश तुळशिराम तिरपुडे (सा.क्र.१०) याने त्याच्या अभियोगपक्षातर्फे घेण्यात

आलेल्या सरतपासणीच्या पुराव्यात पोलीसांनी आरोपीच्या घरातून लाकडी उभारी आणली व त्याला दाखविली, त्यानुसार त्याने ती लाकडी उभारी ओळखुन त्याच्या बैलबंडीची असल्याचे सांगितले, असे सांगितले आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीतील पुराव्यात पोलीसांनी त्याला त्याच्या बैलबंडीची लाकडी उभारी ओळखण्याकरीता पोलीस स्टेशनला बोलविले नसल्याचे सांगितलेले आहे. तसेच सदर साक्षीदाराने लाकडी उभारी (आर्टीकल–अ) सारख्या उभा–या गावातील अनेक बैलबंडयाना असल्याचे मान्य केले आहे. अशा परिस्थितीत, निवेदन आणि जप्तीच्या एवढया महत्वाच्या मुद्दयाबाबतची विसंगती अभियोग पक्षाला मारक ठरणारी आहे. त्यामुळे, निवेदन पंचनामा आणि त्यानुसार तयार करण्यात आलेला जप्ती पंचनाम्यावर संशय निर्माण होतो.

७७. फिर्यादी व तपासण्यात आलेल्या सर्व संबंधीत साक्षीदारांनी त्यांच्या पुराव्यामध्ये आरोपीने लाकडी काठीने मयतास मारहाण केल्याबाबत सांगितले आहे. पंच साक्षीदार कृष्णा चंद्रभान आताग्रे (सा.क्र.९) याने त्याच्या पुराव्यात बैलबंडीची उभारीची लाकडी काठी जप्त केल्याचे सांगितले आहे. तसेच पंच साक्षीदाराने ती लाकडी उभारी (आर्टीकल–अ) न्यायालयासमक्ष ओळखली देखील आहे. तपासी अधिकारी यांनी देखील त्यांच्या पुराव्यामध्ये लाकडी उभारीच जप्त केल्याचे सांगितले आहे. साक्षीदार राजेश तुळशिराम तिरपुडे (सा.क्र.१०) याने त्याच्या बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या पुराव्यात देखील पोलीसांनी त्याला बैलबंडीची लाकडी उभारी ओळखण्याकरीता पोलीस स्टेशन येथे बोलविले नसल्याचे मान्य केले आहे. अभिलेखावरुन देखील लाकडी उभारीच जप्त केल्याचे दिसुन येते. फिर्यादी व साक्षीदारांनी लाकडी काठीबाबत कथन केलेले आहे. पंच साक्षीदार व तपासी अधिकारी यांनी लाकडी उभारीबाबत कथन केलेले आहे. लाकडी काठी आणि

लाकडी उभारी यामध्ये निश्चीतच फरक आहे. जप्त करण्यात आलेले शस्त्र लाकडी उभारी आहे. त्यामुळे एकुणच जप्तीबाबत संशय निर्माण होतो.

७८. कृष्णा चंद्रभान आताग्रे (सा.क्र.९) याने त्याच्या अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या सरतपासणीतील साक्षीपुराव्यामध्ये लाकडी उभारीची पाहणी केली असता त्याचे खालील बाजूस रक्ताचे डाग दिसत होते, असे सांगितले आहे. तपासी अधिकारी यांनी देखील लाकडी उभारीवर रक्ताचे डाग होते, असे सांगितलेले आहे. परंतु रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.७५) नुसार लाकडी काठीवर कोणतेही रक्ताचे डाग नसल्याचा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे. त्यामुळे एकंदरीतच जप्तीबाबत संशय निर्माण होतो. तसेच निवेदन आणि त्यानुसार केलेल्या जप्ती पंचनाम्याबाबत तपासी अधिकारी प्रमोद नागोराव पाटील (सा.क्र.१३) यांनी शासकीय वाहनाचे लॉगबुकचे उतारे दाखल करुन सिध्द केलेले नाही. त्यामुळे, जप्त करण्यात आलेल्या शस्त्राचा घटनेशी संबंध होता, हे सिध्द करण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरलेले आहे.

७९. माननीय सर्वोच्च न्यायालयाने **राधे शाम व ईतर –विरुध्द– राजस्थान शासन, प्रकाशीत २०२३(२) गुन्हा १२८ (सर्वोच्च न्यायालय)** या प्रकरणात असे निष्कर्षित केलेले आहे की, केवळ कथित जप्तीच्या आधारावर दोषसिद्धी टिकवून धरता येत नाही. तर **रेणुकाप्रसाद –विरुध्द– शासन, फौजदारी अपील क्रमांक ३१८९–३१९०/२०२३, फौजदारी अपील क्रमांक ३३९९/२०२४, फौजदारी अपील क्रमांक ८५८६/२०२४, सर्वोच्च न्यायालय, निकाल दिनांक ०९.०५.२०२४** या प्रकरणात माननीय सर्वोच्च न्यायालयाने निष्कर्षीत केलेल्या प्रमेयानुसार आरोपीच्या दोषसिद्धीसाठी न्यायालयीन साक्षीदारांची ठोस व विश्वासार्ह साक्ष आवश्यक आहे; अन्यथा आरोपीस दोषी ठरविता येत नाही; जर दोन भिन्न मते

निष्कर्षीत होत असतील तर आरोपीच्या लाभाचा निष्कर्ष अवलंबवावा, असा निर्वाळा दिलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात देखील कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार किंवा परिस्थितीजन्य पुरावा सुध्दा नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील घटकांशी उपरोल्लेखित सर्वोच्च न्यायालयाने निष्कर्षीत केलेले प्रमेय तंतोतंत जुळते.

८०. संदर्भिय, **लक्ष्मीबाई (वर उल्लेखित),** या प्रकरणी, माननीय सर्वोच्च न्यायालयाने अधोरेखित केले आहे की, 'जर एखाद्या साक्षीदाराच्या साक्षीतील महत्त्वाच्या मुद्दयावर प्रतिपरीक्षा झाली नाही, तर त्या भागातील पुरावा आव्हानरहित राहतो व न्यायालयास अशा आव्हानरहित पुराव्यावर विश्वास ठेवण्याचा अधिकार आहे'. यामागील तत्त्व असे आहे की, साक्षीदारास ज्या मुद्दयावर प्रतिपरीक्षेत स्पष्टीकरण देण्याची संधी दिली गेली नाही, त्या मुद्द्यावर त्यास दोषी ठरविणे योग्य नाही. त्याचप्रमाणे, **पोपट (वर उल्लेखित),** या प्रकरणी, माननीय मुंबई उच्च न्यायालयाने भारतीय पुरावा अधिनियम, कलम १३८ मधून प्रवाहित होणारे स्थिर तत्त्व पुन्हा अधोरेखित केले आहे की, 'जर एखाद्या पक्षास साक्षीदाराने दिलेल्या विधानाची सत्यता, बरोबरी किंवा कायदेशीरता आव्हानीत करायची असेल, तर त्या पक्षाने प्रतिपरीक्षेदरम्यान साक्षीदाराचे लक्ष त्या विधानाकडे वेधून त्यास स्पष्टीकरण देण्याची संधी दिली पाहिजे. जर प्रतिपरीक्षेत साक्षीदार विवादित मुद्दयावर सामोरे गेले नाही, तर नंतर त्या विधानास खोटे किंवा अविश्वसनीय ठरविण्याचा अधिकार त्या पक्षास मिळत नाही'.

८१. उपरोक्त दोन्ही न्यायनिर्णयांमध्ये अधोरेखित केलेले तत्त्व म्हणजे न्याय्य खटल्याचा स्थिर नियम–जर साक्षीदाराच्या विश्वासार्हतेवर एखाद्या विशिष्ट मुद्दयावर प्रश्न उपस्थित करायचा असेल, तर त्या मुद्दयावर प्रतिपरीक्षेदरम्यान साक्षीदारास सामोरे गेले पाहिजे. या कायदेशीर तत्त्वाबाबत कोणताही वाद नाही.

भारतीय पुरावा अधिनियम, कलम १३८ मध्ये अंतर्भूत असलेला नियम हा पुराव्याचे न्याय्य मूल्यांकन सुनिश्चित करण्यासाठी आहे आणि साक्षीदार न्यायालयापुढे तोंडी पुरावा देत असताना त्यास सामोरे न गेलेल्या मुद्दयावर नंतर युक्तिवादाच्या टप्प्यावर आव्हान उभे करण्यास प्रतिबंध करता येते. त्यामुळे न्यायालयास प्रतिपरीक्षेत आव्हान न झालेल्या साक्षीच्या भागांवर विश्वास ठेवण्याचा अधिकार असतो. तथापि, आदरपूर्वक नमूद करावे लागेल की, सदर तत्त्वे या प्रकरणातील अभियोगपक्षाच्या खटल्यास फारसा आधार देत नाहीत. कारण अभियोगपक्षाच्या कथनाबाबत शंका निर्माण करणाऱ्या बाबी केवळ बचाव पक्षाने प्रतिपरीक्षेत केलेल्या सूचनांमुळे किंवा बचाव पक्षाने आव्हान न केलेल्या विधानांवर आधारित नाहीत. उलट, अनेक त्रुटी या अभियोगपक्षाच्या स्वतःच्या पुराव्यांतून व अभियोगपक्षाने सादर केलेल्या दस्तऐवजांतूनच उघड होतात.

८२. सदर प्रकरणात अभियोगपक्षाच्या पुराव्यांमधूनच अनेक त्रुटी स्पष्टपणे दिसून येतात. उदाहरणार्थ, फिर्यादी (सा.क्र.१) हिच्या सरतपासणीमध्ये तिने जयने तिला आरोपीस पाण्याच्या टाकीजवळुन पळताना पाहील्याचे आणि नंतर आरोपीस गोठयाजवळून पळताना पाहील्याचे सांगितले; याबाबत विसंगती आहे, सुरुवातीला पाण्याच्या टाकीजवळ व नंतर गोठ्याजवळ असे दोन भिन्न उल्लेख तिच्या सरतपासणीमध्येच आढळतात. तसेच, मृतक अमोलच्या मानसिक स्थितीबाबत कोणताही पुरावा अभियोगपक्षाने सादर केलेला नाही. मृतक अमोलने मद्यसेवन केले होते, ही बाब जय (सा.क्र.२) याच्या पुराव्याने व रासायनिक विश्लेषण अहवालातील इथाइल अल्कोहोलच्या निष्कर्षाने पुष्टी होते. तसेच फिर्यादीनेही मृतकक अमोल यास मद्यसेवनाची सवय असल्याचे मान्य केले आहे. याशिवाय, घटनास्थळ पंचनाम्यात गोठ्याचे नेमके स्थान दर्शविण्यात आलेले नाही, घटनास्थळी प्रकाशाचा स्रोत सिद्ध

करण्यात अभियोगपक्ष अपयशी ठरलेला आहे, आणि साक्षीदारांचे वर्तनही अस्वाभाविक आहे. या सर्व त्रुटी अभियोगपक्षाच्या स्वतःच्या पुराव्यांतूनच उघड होतात. म्हणूनच, न्यायालय अभियोगपक्षाच्या पुराव्यातील कोणताही भाग केवळ बचाव पक्षाने उलटतपासणीमध्ये आव्हानीत केला नाही; म्हणून नाकारत नाही. तसेच बचाव पक्षाने साक्षीदारास सामोरे न गेलेल्या नव्या तथ्यावर आधारित त्याची विश्वासार्हता कमी करण्याचा प्रयत्नही केलेला नाही. उलट, अभियोगपक्षाच्या स्वतःच्या पुराव्यांतूनच या गंभीर त्रुटी स्पष्टपणे दिसून येतात, ज्यामुळे खटल्याच्या विश्वासार्हतेवर वाजवी शंका निर्माण होते.

८३. सदर प्रकरणातील शंका या बचाव पक्षाने उलटतपासणीमध्ये केलेल्या सूचनांमुळे किंवा आव्हान न झालेल्या विधानांवर आधारित नाहीत. त्या थेट अभियोगपक्षाच्या स्वतःच्या पुराव्यातून, दस्तऐवजांमध्ये किंवा परिस्थितींच्या साखळीत आवश्यक दुवे सिद्ध करण्यात झालेल्या अपयशातून निर्माण होतात. त्यामुळे उल्लेखित न्यायनिर्णय वस्तुस्थिती व तथ्यानुसार वेगळे ठरतात. ते केवळ या तत्त्वावर भर देतात की, जर साक्षीदार एखाद्या मुद्दयावर प्रतिपरीक्षेत सामोरे गेले नाही, तर त्या भागातील साक्ष विनाआव्हानीत राहते. परंतु ते अभियोगपक्षाच्या प्राथमिक जबाबदारीतून म्हणजेच खटला संशयापलिकडे जावुन सिद्ध करण्याच्या कर्तव्यातून सूट देत नाहीत. ज्या ठिकाणी अभियोगपक्षाच्या पुराव्यातच महत्त्वाच्या विसंगती, त्रुटी व अशक्यप्राय बाबी आढळतात, तेथे अशा तत्त्वांचा आधार घेऊन दोष दूर करता येत नाही किंवा हरवलेले दुवे पुरवता येत नाहीत. परिणामी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी उपरोल्लेखीत न्यायनिर्णयांवर ठेवलेली भिस्त अभियोगपक्षाच्या खटल्यास पुढे नेणारी ठरत नाही.

८४. अशा परिस्थितीत, आरोपीला दोषी ठरविण्यासाठी अभियोग पक्षाने

परिस्थितीची साखळी स्थापित करण्यासाठी कोणतीही कसर सोडायला नको होती. तपासी अधिकारी, प्रमोद नागोराव पाटील (सा.क्र.१३) यांनी त्यांच्या साक्षीत त्यांनी केलेल्या औपचारिक तपासकामासंदर्भात कथन केलेले आहे. बचावपक्षातर्फे रासायनिक विश्लेषण अहवाल मान्य केलेले असल्याने त्यांना अनुक्रमे नि.क्र.७३ ते ७६ देण्यात आलेले आहे. रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.७३) नुसार मयत अमोल बाळकृष्ण तालन याच्या डोक्यावरील केसांचा नमुना नि.क्र.२ आणि नखांचा तुकडा नि.क्र.३ रक्ताने माखलेले आहेत, नखांचा तुकडा नि.क्र.३ वर कोणताही ऊतीजन्य पदार्थ आढळला नाही आणि मृताचा रक्ताचा नमुना नि.क्र.१ घेण्याचा प्रयत्न केला गेला नाही व रक्तगट ब आहे. तसेच रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.७४) नुसार नि.क्र.१ व २ मधील आरोपीचे रक्त 'ओ' रक्तगटाचे आहे, नि.क्र.३ आरोपीच्या नखांच्या तुकडयाच्या नमुन्यात रक्त किंवा ऊतीचा अंश आढळला नाही आणि नि.क्र.४ मधील आरोपीच्या डोक्याच्या केसांमध्ये रक्त आढळले नाही.

८५. रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.७५) नुसार नि.क्र.१ डांबर लेबल–अ रक्ताने माखले आहे आणि त्यावर मानवी रक्त आहे, नि.क्र.२ कापडी पट्टी लेबल अ–१ रक्ताने माखलेले आहे आणि त्यावर मानवी रक्त असुन त्याचा रक्तगट ब आहे, नि.क्र.६ गमछा लेबल सी–२ रक्ताने जवळजवळ पुर्णपणे भिजलेले आहे. रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.७५) नुसार नि.क्र.४ फुल पॅन्ट लेबल सी वर सुमारे ०.१ सेमी. ते ४ सेमी. व्यासाचे रक्ताचे डाग ठिकठिकाणी मोठया संख्येने पसरलेले आहेत, नि.क्र.५ अंडरविअर लेबल सी–१ वर सुमारे ०.१ सेमी. ते ०.८ सेमी. व्यासाचे रक्ताचे काही डाग ठिकठिकाणी पसरलेले आहेत, नि.क्र.७ चादर लेबल सी–३ वर सुमारे ०.१ सेमी. व्यासापासुन ते मोठया आकारापर्यंतचे रक्ताचे

डाग ठिकठिकाणी मोठया संख्येने पसरलेले आहेत, नि.क्र.८ जर्किन लेबल सी–४ वर सुमारे ०.१ सेमी ते ४.५ सेमी. व्यासाचे रक्ताचे डाग ठिकठिकाणी मध्यम संख्येने पसरलेले आहेत आणि नि.क्र.९ फुल शर्ट लेबल–जी वर सुमारे ०.१ सेमी. ते ०.८ सेमी. व्यासाचे रक्ताचे काही डाग मुख्यतः डाव्या खांद्याच्या भागावर पसरल्याचे दिसुन आले आहेत आणि नि.क्र.४, ५, ७ व ८ मधील नमुने मानव प्रजातीचे असुन त्याचा रक्तगट 'ओ' आहे. तसेच रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.७६) नुसार नि.क्र.१ व्हिसेरा आणि त्यातील घटक असे लेबल असलेल्या प्लास्टीकच्या बरणीतील अवयव, नि.क्र.२ प्रत्येकी १/३ यकृत, १/२ प्लीहा, १/२ मूत्रपिंड असे लेबल असलेल्या प्लास्टीकच्या बरणीतील अवयव आणि नि.क्र.३ मृतक अमोल तालन याचे रक्त, ज्यामध्ये नि.क्र.१ आणि २ मध्ये अनुक्रमे १०० ग्रॅममागे (१०३) आणि (९९) मिलिग्रॅम इथाइल अल्कोहोल आहे आणि नि.क्र.३ मध्ये १०० मिलीमीटरमागे (१०१) मिलीग्रॅम इथाइल अल्कोहोल आहे. आरोपीचा निळया रंगाचा फुल शर्ट, नि.क्र.९ फुल शर्ट लेबल–जी वर सुमारे ०.१ सेमी. ते ०.८ सेमी. व्यासाचे रक्ताचे काही डाग मुख्यतः डाव्या खांद्याच्या भागावर पसरल्याचे दिसुन आले आहेत परंतु त्यावर असलेल्या रक्तगटाचे निष्कर्ष अनिर्णीत असल्याने तो अभियोगपक्षाच्या कोणत्याही उपयुक्ततेचा नाही. तसेच आरोपीची हिरवट काळपट रंगाची फुल लेबल–जी–१ आणि लाकडी उभारी यावर कोणतेही रक्त आढळलेले नाही.

८६. अभिलेखावरील रासायनिक विश्लेषण अहवालाच्या स्वरुपातील पुरावा अभियोगपक्षास समर्पक ठरत नाही. प्रस्तुत प्रकरणी अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे जप्त करण्यात आलेल्या वस्तू रासायनिक विश्लेषणाकरीता पाठविण्यात आलेल्या होत्या, मात्र सदरचे रासायनिक विश्लेषण अहवालांचे अनिर्णीत निष्कर्षावरुन उपरोक्त मुद्देमालाशी आरोपीचा परस्परसंबंध गुन्हयासंबंधाने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या

जोडणारा कोणताही पुरावा आलेला नसल्याने अभियोगपक्ष आरोपीचा गुन्हयाशी थेट संबंध असल्याची बाब सिध्द करण्यास अपयशी ठरलेला आहे. त्याचप्रमाणे आरोपीचा प्रत्यक्ष घटनेशी संबंध जोडणारा पुरक पुरावा अभिलेखावर नाही.

८७. डॉ. प्रवीण रामभाऊ झोपाटे (सा.क्र.१२) यांनी त्यांच्या साक्षीत सांगितले की, अमोल बालकृष्ण तालन, राहणार येसगाव यांच्या शरीरावर असलेल्या जखमा जप्त केलेल्या लाकडी लाठीने किंवा अशा प्रकारच्या इतर शस्त्राने होऊ शकतात. त्यांनी असेही सांगितले की, शवविच्छेदन अहवालात नमूद केलेल्या जखमा कठीण व बोथट शस्त्राने होऊ शकतात. त्यानुसार, त्यांनी क्वेरी अहवाल व लाकडी उभारीचे रेखाटन (नि.क्र.८७/सा.क्र.१२) तयार केले. क्वेरी अहवाल (नि.क्र.८७/सा.क्र.१२) नुसार मयताच्या शरीरावर झालेल्या जखमा जप्त हत्यार लाकडी उभारीने होवु शकतात असे मत व्यक्त केलेले आहे. त्याअनुषंगाने पंच साक्षीदार कृष्णा चंद्रभान आताग्रे (सा.क्र.९) आणि तपासी अधिकारी प्रमोद नागोराव पाटील (सा.क्र.१३) यांनी दिलेल्या पुराव्याचे बारकाईने निरीक्षण केले असता असे दिसुन येते की, पंच साक्षीदाराने त्याच्या अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या सरतपासणीच्या साक्षीपुराव्यामध्ये लाकडी उभारी जप्त करण्यापुर्वी श्री. तिरपुडे त्याठिकाणी आले व त्यांनी ती लाकडी उभारी त्यांच्या बैलबंडीची असल्याचे सांगितले होते. याउलट तपासी अधिकारी यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये सदरच्या बाबीविषयी काहीही सांगितलेले नाही. पंच साक्षीदाराने त्याच्या अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या सरतपासणीतील साक्षीपुराव्यामध्ये लाकडी उभारीची पाहणी केली असता त्याचे खालील बाजूस रक्ताचे डाग दिसत होते, असे सांगितले आहे. तपासी अधिकारी यांनी देखील लाकडी उभारीवर रक्ताचे डाग होते, असे सांगितलेले आहे. परंतु रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.७५) नुसार लाकडी उभारीवर कोणतेही

रक्ताचे डाग नसल्याचा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे. त्यामुळे एकंदरीतच लाकडी उभारीच्या जप्तीबाबत संशय निर्माण होतो.

८८. आरोपीचे जप्त केलेले कपडे जप्ती पंचनामा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने सुरेंद्र पद्माकर डफरे (सा.क्र.४) यांना (नि.क्र.३९) वर तपासलेले आहे. त्याने त्याच्या अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या सरतपासणीतील साक्षीपुराव्यामध्ये कथन केले की, दिनांक १०.०१.२०२२ रोजी, पोलीसांनी त्याला पंचनामा करण्यासाठी सुचनापत्र (नि.क्र.४१) दिले होते. त्यानुसार पोलीसांनी त्यांच्या समक्ष आरोपीला अटक करुन त्याचे कपडे जप्त करुन त्यानुसार जप्ती पंचनामा (नि.क्र.४२) तयार केला होता. तसेच पोलीसांनी सेवाग्राम रुग्णालयातुन मयत अमोल याचे आतडे, किडणी, यकृत, रक्त, नखे, केस आणि इत्यादी नमुने जप्त केले होते आणि त्यानुसार जप्ती पंचनामा (नि.क्र.४३) तयार केल्याचे सांगितले. तपासी अधिकारी यांनी घटनास्थळ पंचनाम्याबाबत पंच साक्षीदाराच्या साक्षीपुराव्याला दुजोरा देणारा पुरावा दिलेला आहे. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये सदर साक्षीदाराने स्पष्ट शब्दात मान्य केले की, आरोपीला आधीच अटक करण्यात आली होती आणि दोन रक्ताच्या बरण्या व्यतिरीक्त पोलीसांनी अन्य काहीच जप्त केले नाही तसेच बरण्या कोठुन आणल्या ते त्याला माहिती नाही. त्यामुळे, पोलीसांनी पंच साक्षीदाराच्या समक्ष आरोपीचे कपडे जप्त केले किंवा नाही यावर संशय निर्माण होतो.

८९. घटनास्थळ पंचनामा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने सुरेंद्र पद्माकर डफरे (सा.क्र.४) यांना (नि.क्र.३९) वर तपासलेले आहे. त्याने त्याच्या अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या सरतपासणीतील साक्षीपुराव्यामध्ये कथन केले की, दिनांक १०.०१.२०२२ रोजी, दुपारी २.०० वाजताच्या सुमारास पोलीसांनी

त्याला पंचनामा करण्यासाठी येसगाव पाणी टाकीजवळ बोलविले होते. पोलीसांनी त्यांच्या समक्ष घटनास्थळाची पाहणी केली. पोलीसांनी त्यानुसार दिसणा–या वस्तुस्थितीचा पंचनामा (नि.क्र.४०) तयार केला. तपासी अधिकारी यांनी घटनास्थळ पंचनाम्याबाबत पंच साक्षीदाराच्या साक्षीपुराव्याला दुजोरा देणारा पुरावा दिलेला आहे. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये पंच साक्षीदाराने स्पष्ट शब्दात मान्य केले की, घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.४०) च्या नकाशात पाण्याच्या टाकीजवळ विद्युत पोल दाखविला नाही तसेच नकाशामध्ये पाण्याच्या टाकीजवळ गोठा दाखविला नाही. सदरच्या बाबी तपासी अधिकारी यांनी देखील बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या पुराव्यात सांगितलेल्या आहेत. अशा परिस्थितीत, घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.४०) चे अवलोकन करणे क्रमप्राप्त ठरते. घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.४०) चे बारकाईने अवलोकन केले असता त्यामध्ये नकाशा काढण्यात आलेला असुन नकाशात पाण्याच्या टाकीजवळ विद्युत पोल दाखविला नाही तसेच नकाशामध्ये पाण्याच्या टाकीजवळ गोठा देखील दाखविला नाही. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांनी देखील त्यांच्या साक्षीमध्ये सदर बाबींचा उल्लेख केलेला आहे. परंतु त्या पंचनाम्यातील नकाशामध्ये दाखविण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे, एकंदरीतच घटनास्थळ पंचनामा यावरच संशय निर्माण होतो.

९०. माननीय सर्वोच्च न्यायालयाने **वैभव –विरुध्द– महाराष्ट्र शासन, २०२५ ऑल एम.आर. (फौजदारी) ३२२९ (सर्वोच्च न्यायालय)** या प्रकरणात निष्कर्षीत केलेल्या प्रमेयानुसार, परिस्थितिजन्य पुरावा दोषसिद्धीसाठी ग्राह्य धरता येतो, परंतु सदरचे पुराव्याची पूर्ण, अखंड व विश्वासार्ह साखळी तयार करणे आवश्यक आहे. अपूर्ण किंवा तुटलेली साखळी असल्यास आरोपीस दोषी ठरविता येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुद्ध दोषारोप सिद्ध करण्यासाठी आवश्यक परिस्थितीजन्य पुराव्याची साखळी अखंड ठेवण्यात व सिद्ध करण्यात अभियोगपक्षाला अपयश आलेले आहे, बचावपक्षाने या प्रकरणी काही बाबी मान्य जरी केल्या तरी वरील निवाडयातील न्यायतत्व आरोपीच्या बचावाचे दृष्टीने या प्रकरणी पूर्णपणे लागु पडते. त्यामुळे जप्त वस्तुंचे संबंधाने जप्तीपासुन ते प्रादेशिक न्यायवैद्यक प्रयोगशाळा, नागपूर येथे जप्त मुद्देमालाचे ताब्याची साखळी जुळून येत नाही.

९१. आरोपीने मयत अमोल तालन याचा खून केला याबाबत कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर आणण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरलेले आहे, त्याबाबत कोणताही समर्पक असा वैद्यकीय/वैज्ञानिक पुरावा अभियोगपक्षाने सिध्द केलेला नाही. अभियोगपक्षाला सदरहु घटनेचा एकही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार मिळु शकलेला नाही. फिर्यादी व साक्षीदारांनी आरोपीची मुलगी सुषमा आणि मयत अमोल तालन याच्यामध्ये असलेल्या अनैतिक संबंधाबाबत सांगितले असले तरी सदर बाब सिध्द करण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरलेले आहे.

९२. माननीय सर्वोच्च न्यायालयाने, **शरद बिरादीचंद सारडा .विरुध्द. महाराष्ट्र शासन, ए.आय.आर.१९८४, सर्वोच्च न्यायालय १६२२,** या प्रकरणात परिस्थितिजन्य पुराव्याबाबत खालील अटी घालून दिलेल्या आहेत : (१) दोषारोप सिद्ध करण्यासाठी ज्या परिस्थितींचा आधार घेतला जातो त्या पूर्णपणे सिद्ध झालेल्या असाव्यात. (२) सिद्ध झालेल्या तथ्ये आरोपीच्या दोषारोपाशी सुसंगत असावीत आणि ती अन्य कोणत्याही संकल्पनेशी सुसंगत नसावीत. (३) परिस्थिती निर्णायक स्वरूपाची व प्रवृत्तीची असावी. (४) त्या परिस्थितीने आरोपीच्या निर्दोषत्वाशी सुसंगत असलेली प्रत्येक शक्यता नाकारली गेली पाहिजे. (५)

पुराव्यांची साखळी इतकी पूर्ण असावी की आरोपी निर्दोष असण्याची कोणतीही शक्यता राहु नये आणि मानवी संभाव्यतेनुसार गुन्हा आरोपींनीच केला आहे असे दिसून यावे.

९३. प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षाला दोषारोप सिद्ध करण्यासाठी आवश्यक व विश्वासार्ह पुरावे सादर करण्यात अपयश आले आहे. परिस्थितींची साखळी पूर्णपणे सिद्ध झालेली नाही व आरोपीच्या निर्दोषत्वाशी सुसंगत असलेली शक्यता नाकारली गेलेली नाही. आरोपीविरुद्ध दोषारोप सिद्ध करण्यासाठी परिस्थितींचा आधार घेतला जात असल्यास त्या परिस्थिती शंका न ठेवता सिद्ध झालेल्या असाव्यात. परिस्थितींचा एकत्रित परिणाम आरोपीच्या निर्दोषत्वाला नाकारून दोषारोप सिद्ध करणारा असावा. जर परिस्थिती दोन अर्थ घेऊ शकत असेल तर आरोपीच्या बाजूचा अर्थ ग्राह्य धरावा.

९४. आरोपी निर्दोष असण्याची शक्यता पूर्णपणे नाकारली गेली पाहिजे. परिस्थितिजन्य पुराव्यावर आधारित प्रकरणात दोषारोप फक्त तेव्हाच सिद्ध होऊ शकतो जेव्हा सर्व परिस्थिती आरोपीच्या निर्दोषत्वाशी विसंगत असतात. केवळ संशय, कितीही तीव्र असला तरी, तो कायदेशीर पुराव्याचा पर्याय ठरू शकत नाही. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांच्या पुराव्यातील विसंगती व अशक्यता लक्षात घेता, आरोपीने अमोलचा खून लाकडी काठी किंवा उभारीने केला; असे म्हणता येत नाही. त्याविषयीचा कोणताही ठोस पुरावा उपलब्ध नाही. परिस्थितिजन्य पुरावे आरोपीच्या दोषारोपाशी सुसंगत नाहीत.

९५. एखाद्या व्यक्तीचा हेतू गुन्हा करण्याच्या मूळ कारणांशी संबंधित असतो. गुन्हा घडण्यामागील विविध घटकांचा विचार करून ते सहसा निश्चित केले जाऊ

शकते. जेव्हा खटला परिस्थितीजन्य पुराव्यांवर आधारित असतो तेव्हा हेतू महत्त्वाची भूमिका बजावतो. हाती असलेल्या प्रकरणातही, परिस्थितीची साखळी स्थापित करण्यात हेतू महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. फिर्यादी व तपासण्यात आलेल्या सर्व तथाकथित प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी मयत अमोल तालन याच्या आरोपीच्या मुलीसोबत असलेल्या अनैतिक संबंधाच्या कारणावरुन आरोपीने मयताचा खून केल्याचे सांगितले आहे. सदरचे सर्व साक्षीदार फिर्यादीचे नातेवाईक आणि शेजारी आहेत त्यांनी केवळ फिर्यादीच्या कथनावर आधारित साक्ष दिल्याचे दिसुन येते, त्यामुळे त्यांच्या साक्षीची विश्वासार्हता कमी होते. सर्व साक्षीदार फिर्यादीचे नातेवाईक आणि शेजारी असल्याने त्यांना वैयक्तिक स्वार्थ असू शकतो. सदर प्रकरणात कोणताही स्वतंत्र, निष्पक्ष साक्षीदार उपलब्ध नसल्यामुळे अभियोगपक्षाची बाजू कमकुवत ठरते. याउलट फिर्यादी अर्चना (सा.क्र.१) आणि जय तालन (सा.क्र.२) यांनी त्यांच्या बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये मयत अमोल तालन यास दारु पिण्याचे व्यसन होते हे स्पष्ट शब्दात मान्य केलेले आहे. या प्रकरणात अभियोग पक्षाने परिस्थितीची साखळी स्थापित केलेली नाही. अशाप्रकारे, गुन्हा घडण्यामागील हेतू सिद्ध करण्यात अभियोग पक्ष अपयशी ठरलेला आहे.

९६. जरी अभियोगपक्षाने मृत्यू हा मनुष्यवध (homicidal) असल्याचे यशस्वीरीत्या सिद्ध केले असले, तरी आरोपीनेच सदर गुन्हा केला हे संशयापलीकडे सिद्ध करण्यात ते अपयशी ठरलेले आहे. अभियोगपक्षाचे प्रकरण मुख्यत्वे कथित मौखिक मृत्युपूर्व निवेदन (oral dying declaration) व परिस्थितिजन्य पुराव्यावर आधारित आहे. तथापि, कथित मौखिक मृत्युपूर्व निवेदन विश्वासार्ह वाटत नाही. मयत शारीरिक व मानसिक दृष्ट्या अशा निवेदनासाठी सक्षम स्थितीत होता, हे अभियोगपक्ष सिद्ध करू शकलेला नाही. उलट, पुराव्यांनुसार मयतास अनेक गंभीर

जखमा झालेल्या होत्या, त्याने घटनेपूर्वी मद्यसेवन केलेले होते व रासायनिक विश्लेषण अहवालात त्याच्या शरीरात इथाइल अल्कोहोलचे अस्तित्व आढळलेले आहे. या परिस्थिती असूनही, कोणत्याही साक्षीदाराने मयत शुद्धीत, सजग व सुसंगत निवेदन करण्यास सक्षम होता, असे सांगितलेले नाही. जेव्हा अभियोगपक्ष मुख्यत्वे मौखिक मृत्युपूर्व निवेदनावर दोषारोप सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा ही त्रुटी अत्यंत महत्त्वाची ठरते.

९७. अभियोगपक्षाच्या पुराव्यात भौतिक विसंगती व त्रुटी आढळतात. फिर्यादीने स्वतःच ज्या ठिकाणावरून जय (सा.क्र.२) ने आरोपीला पळून जाताना पाहिले असे सांगितले, त्याबाबत परस्परविरोधी आवृत्ती दिलेली आहे. कथित 'गोठा' चे नेमके स्थान घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.४०) मध्ये नमूद करण्यात अभियोगपक्ष अपयशी ठरलेला आहे. तसेच घटनेच्या ठिकाणी, रात्री आरोपीची योग्य ओळख पटविण्यासाठी पुरेसे प्रकाशमान उपलब्ध होते, हेही सिद्ध करण्यात अभियोगपक्ष अपयशी ठरलेला आहे. जय (सा.क्र.२) व आरोपी यांचे वर्तनही अप्राकृतिक वाटते. या सर्व परिस्थिती, तसेच कथित मौखिक मृत्युपूर्व निवेदनास समाधानकारक पुष्टी न मिळाल्यामुळे, अभियोगपक्षाचे प्रकरण संशयास्पद ठरते.

९८. पोपट खंडू पिसाळ, लक्ष्मीबाई व जगबीरसिंह (वर उल्लेखित) या प्रकरणांमध्ये प्रतिपादित कायदेशीर तत्त्वे स्थिर व निर्विवाद आहेत. तथापि, सदर निर्णय तथ्यपरत्वे भिन्न असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणास लागू होत नाहीत. सदर प्रकरणात अंतर्गत त्रुटी, भौतिक विसंगती व अभियोगपक्षाने कथित मौखिक मृत्युपूर्व निवेदनावर विश्वास निर्माण करण्यासाठी आवश्यक मूलभूत तथ्ये सिद्ध करण्यात झालेली अपयशता आढळते. परिणामी, वरील न्यायनिर्णयांचा आधार अभियोगपक्षाच्या प्रकरणास कोणतीही मदत करीत नाही.

९९. गुन्हेगारी न्यायशास्त्राचा मूलभूत सिद्धांत असा आहे की, संशय कितीही तीव्र असला तरी तो पुराव्याचा पर्याय ठरू शकत नाही. अभियोगपक्षाने आरोपीचा दोष संशयापलीकडे सिद्ध करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्ष ज्या परिस्थितींवर अवलंबून राहिले आहे, त्या परिस्थिती आरोपीच्या दोषाकडेच निर्देश करणारी अखंड व पूर्ण साखळी निर्माण करीत नाहीत. पुराव्यातून वाजवी शंका निर्माण होते व अशा शंकेचा लाभ आरोपीस देणे आवश्यक ठरते. परिणामी, या न्यायालयाचा निष्कर्ष असा आहे की, अभियोगपक्ष आरोपीचा दोष संशयापलीकडे सिद्ध करण्यात अपयशी ठरलेले आहे व आरोपीस शंकेचा लाभ देऊन निर्दोष मुक्तता मिळण्याचा अधिकार आहे.

१००. परिणामी, वरील चर्चेनंतर आणि अभिलेखावरील कागदपत्रे, परिस्थितीचा विचार करता, स्वयंस्पष्ट पुराव्याअभावी अभियोग पक्ष संहितेच्या कलम ३०२ अंतर्गत दंडनीय गुन्हयासाठी आरोपीचा दोष सिद्ध करण्यासाठी सबळ, ठोस, विश्वासार्ह व स्विकारण्याजोगा संयुक्तिक पुरावा सादर करण्यात अपयशी ठरला आहे, जो वाजवी शंका पलीकडे आहे. उपरोक्त विश्लेषणावरुन, संशयास्पद, लक्षणीय कमकुवत पुराव्याच्या आधारे आरोपीस दोषी ठरविणे न्यायोचित होणार नाही, उलट निर्माण झालेल्या शंकांचा लाभ आरोपीस मिळणे क्रमप्राप्त ठरते. म्हणून, मी मुद्दे क्रमांक २ व ३ चे निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ४ बाबत</u> :-**

१०१. मुद्दे क्रमांक १ ते ३ चे निष्कर्षांनुसार आणि उपरोक्त चर्चेवरून अभियोगपक्ष आरोपीविरूध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३०२ प्रमाणे दोषारोप अभियोगपक्षाचे कथनास पुष्टी देणा-या पुराव्याअभावी सिध्द करण्यास अयशस्वी

ठरलेले आहे. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. जप्त मुद्देमाल मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणे न्यायोचित होईल. तसेच या प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक निळया रंगाचा ओप्पो कंपनीचा मोबाईल आय.एम.ई.आय. क्रमांक ८६८३३००५३५२८७१९ व ८६८३३०० ५३५२८७०१ ज्यामधे जीओ कंपनीचे सिम होते आणि एक निळया रंगाचा ओप्पो कपंनीचा मोबाईल आय.एम.ई.आय. क्रमांक ८६९५७७०४२५६५९७५ व ८६९५७७०४२५६५९६७ ज्यामधे जीओ कंपनीचे सिम होते, ते दोन्ही मोबाईल हॅन्डसेट अपील कालावधीनंतर संबंधितांना कागदपत्राच्या पडताळणीअंती परत करणे संयुक्तिक होईल. या प्रकरणातील इतर जप्त मुद्देमाल मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणे संयुक्तिक होईल. सबब, मी मुद्दा क्रमांक ४ च्या उत्तराबाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) आरोपी निळकंठ उर्फ कंठया देवराव ठाकरे यांची भारतीय दंड विधानाचे कलम ३०२ अन्वयेच्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २३५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) आरोपीचे बंधपत्र आणि जातमुचलका रद्द करण्यात येत आहे.

३) या प्रकरणातील जप्त एक निळया रंगाचा ओप्पो कंपनीचा मोबाईल आय.एम.ई.आय. क्रमांक ८६८३३००५३५२८७१९ व ८६८३३०० ५३५२८७०१ ज्यामधे जीओ कंपनीचे सिम होते आणि एक निळया रंगाचा ओप्पो कपंनीचा मोबाईल आय.एम.ई.आय. क्रमांक ८६९५७७०४२५ ६५९७५ व ८६९५७७०४२५६५९६७ ज्यामधे जीओ कंपनीचे सिम होते, ते अपील कालावधीनंतर संबंधितांना कागदपत्राच्या पडताळणीअंती परत करण्यात यावेत व इतर जप्त मुद्देमाल मुल्यहीन असल्याने अपील

कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावा.

४) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७(अ) अन्वये वरिष्ठ न्यायालयात अपील अथवा याचिका दाखल झाल्यास हजर होण्याचा दृष्टीकोनातून रक्कम रुपये ५०,०००/– (पन्नास हजार) चे वैयक्तिक बंधपत्र आणि तेवढ्याच रकमेचा जातमुचलका दाखल करावा.

HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD
Digitally signed by HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD
Date: 2026.08.01 16:40:50 +0530

वर्धा. (हेमंत भ. गायकवाड)

दिनांक : ३१.०७.२०२६. सत्र न्यायाधीश, वर्धा.

## Certificate

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment.

(P.N.Shete)
Stenographer Grade-III